चला स्विमिंग ला...
स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड,
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/ छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला साऊथ इंडियन
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०३.०४.२०२६ | अंक नं. ००३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090



92.5% शुध्द चांदीमधील अप्रतिम दागिन्यांची असंख्य व्हरायटी
लेडिज अंगठी | फॅन्सी टॉप व रिंगा | लेडिज ब्रासलेट | फॅन्सी गंठन व नेकलेस | कडली | घड्याळ
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
फॅन्सी पायलच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन उपलब्ध




## कोठी ते यश पॅलेस रस्त्यावर जीवघेणे खड्डे

शहरातील कोठी ते यश पॅलेस रस्त्यावर कोठी परिसरात मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्डयांमुळे वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. हे खड्डे अपघातांना निमंत्रण देत असून ते जीवघेणे ठरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संपूर्ण रस्ता चांगला असताना या रस्त्याच्या एंट्रीलाच पडलेले हे खड्डे महापालिका प्रशासनाने तातडीने बुजवावेत अशी मागणी होत आहे. (छाया – बबलू शेख)

# अवकाळी पावसाचा तडाखा; ७५ गावांमधील ६ हजार ३६५.७० हेक्टरवरील पिकांचे नुकसान

नगर – जिल्ह्यात झालेला अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाल्याचे प्राथमिक अहवालातून समोर आले आहे. एकूण ७५ गावांतील ८ हजार ८२१ शेतकऱ्यांच्या ६ हजार ३६५.७० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान नोंदवले गेले आहे.

जिल्ह्यात १ व २ एप्रिल रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने शेतपिकांचे मोठे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाच्या अहवालात नोंदविण्यात आला आहे. या नैसर्गिक आपत्तीमध्ये मानवी जीवितहानी झाली नसली तरी दोघेजण जखमी झाले आहेत तसेच एक गाय दगावल्याचे सांगण्यात आले. या अवकाळी पावसामुळे व वादळी वाऱ्यामुळे जिल्ह्यातील ७१ घरांची पडझड झाली आहे. तालुकानिहाय आकडेवारीनुसार नेवासा तालुक्यात सर्वाधिक फटका बसला असून २७ गावांतील ३८१० शेतकऱ्यांच्या ३४१० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे मोठे नुकसान झाले असून ऊस, कांदा, मका, भाजीपाला, हरभरा व केळी पिकांवर परिणाम झाला आहे. पारनेर तालुक्यात ८ गावांतील १२८० शेतकऱ्यांच्या ७४०.५० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. येथे कांदा, मका, बाजरी, ज्वारी व भाजीपाला पिकांना फटका बसला आहे. पाथर्डी तालुक्यात २३ गावांतील १८६६ शेतकऱ्यांच्या ९७२.६० हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. या भागात कापूस, मका, ज्वारी, हरभरा, गहू आदी पिकांचे नुकसान झाले आहे.

राहुरी तालुक्यात ६ गावांतील ८१५ शेतकऱ्यांच्या ४७५ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. शेवगाव तालुक्यात २ गावांतील १०७ शेतकऱ्यांच्या असून ७४ हेक्टर पिकांचे नुकसान झाले आहे. राहाता तालुक्यात ९ गावांतील ९४३ शेतकऱ्यांचे ६९३.६० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. येथे गहू, कांदा, मका, हरभरा, ऊस व इतर पिकांना फटका बसला आहे.

### पावसाने राहाता, संगमनेरला झोडपले

२ एप्रिल रोजी संगमनेर, अकोले राहाता तालुक्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली असून संगमनेर, घुलेवाडी आणि संगमनेर खुर्द येथे प्रत्येकी ३६.८ मि.मी. पाऊस झाला. तसेच आश्वी, शिबलापूर, समनापूर आणि पिंपरणे येथे १७.३ मि.मी., तळेगाव येथे १६ मि.मी. तर निमोण येथे १६ मि.मी. पावसाची नोंद झाली. अकोले तालुक्यात विरगाव आणि समशेरपूर येथे प्रत्येकी ३६.८ मि.मी. पावसाची नोंद झाली. साकीरवाडी येथे ४.५ मि.मी., राजूर, शेंडी आणि वाकी येथे प्रत्येकी ६.३ मि.मी., तर अकोले आणि रंभोडी येथे ०.८ मि.मी. पाऊस झाला. कोतूळ आणि ब्राम्हणवाडा येथे पाऊस झाला नाही. राहाता तालुक्यात लोणी येथे सर्वाधिक ३६.८ मि.मी. पाऊस झाला. राहाता आणि अस्तगाव येथे प्रत्येकी १०.५ मि.मी., बाबळेश्वर येथे ८ मि.मी., पुणतांबा येथे ५.८ मि.मी., तर शिर्डी येथे ३.३ मि.मी. पावसाची नोंद झाली. तालुक्याची सरासरी १२.५ मि.मी. इतकी आहे.


SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अ‍ॅण्ड मार्बल इंडस्ट्रिज
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999



भाजपा स्थापना दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा..
उगवता सूर्य तुम्हाला आशिर्वाद देवो,
बहरलेली फुले तुम्हाला सुगंध देवो,
आणि परमेश्वर आपणांस सदैव सुखात ठेवो..
मा.श्री. सौरभ किशोर राऊत
उपाध्यक्ष : भाजपा वकिल आघाडी
वकिल साहेब आपणांस वाढदिवसाच्या शुभेच्छा
* शुभेच्छुक *
ॲड. चंदन भगवान बारटक्के — अध्यक्ष : भाजपा वकिल आघाडी
ॲड. विवेकजी नाईक — महाराष्ट्र प्रदेश विशेष निमंत्रित सदस्य
ॲड. अविनाश साखला — मा. सरचिटणीस भाजपा मध्यमंडल
ॲड. राहुल रासकर — मा. अध्यक्ष भाजपा वकिल आघाडी
मा.श्री. शशांक कुलकर्णी । डॉ. केशव बारटक्के
ॲड. निखिल मुसळे, ॲड. संदिप काळे, ॲड. हरिष कल्याणी
ॲड. संतोष भोसे, ॲड. योगेश मांडोत, ॲड. आशीष पोटे
ॲड. वर्धमान भंडारी, ॲड. सचिन घावटे, ॲड. गणेश शर्मा
ॲड. किरण बनारसे, ॲड. कैलास कोतकर, ॲड. निखिल सुपेकर
ॲड. विजय महाजन, ॲड. व्यंकटेश शिरसुल, ॲड. रविंद्र लगड
ॲड. रुपेश भामरे, ॲड. संदीप पडोळे, ॲड. देवेंद्र बंब
भारतीय जनता पार्टी
शहर वकिल आघाडी, सर्व पदाधिकारी, अहिल्यानगर



महेंद्र पेडावाला
रजवाडी गुजराती थाळी
पार्सल सुविधा उपलब्ध..
स्पेशल आमरस 400/- किलो
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय
कापड बाजार, अहिल्यानगर



द्वितीय पुण्यस्मरण
स्व. विजयाबाई प्रकाश गुंदेचा
स्व. ३ एप्रिल २०२४
किर्ती सुगंधाचा वृक्ष फुलवूनी, माया, प्रिती, देवूनी
सर्वांची मने जिंकूनी, सत्य सचोटीचा मार्ग देवूनी
अमर जाहला आपण जीवनी, स्मृतीत दडल्या अनंत आठवणी
भावपूर्ण श्रध्दांजली
* शोकाकुल *
प्रकाश गुंदेचा
प्रितम गुंदेचा – सौ. सारिका गुंदेचा
निलिमा भंडारी – डॉ. सचिन भंडारी
श्रेयस । साची । जय । ग्रीष्मा
एवंम् गुंदेचा परिवार



॥ प्रथम पुण्यस्मरण ॥
आपले प्रेम.. आदर्श विचार लाभले सदैव परिवाराला..
आपणांस विसरणे कदापी शक्य नाही !
आपल्या पुण्यात्म्यास शांती लाभो.. हिच मनोमनीची प्रार्थना !
स्व. अशोक हिरालाल जोशी
स्वर्गवास दि. ४ एप्रिल २०२५
• शोकाकुल •
जोशीबंधू बन्सीमहाराज मिठाईवाले
। रामचंद्र खुंट, अहिल्यानगर.
। गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर.
समस्त जोशी परिवार व जोशीबंधू मित्र परिवार.
मो. ९४२२७३३४३४, ९८६०५६६५०९



लूट लो ऑफर
फक्त पुरुषांसाठी शर्ट, टि-शर्ट, लोवर या पैकी काहिही ३ घ्या फक्त रु.५००/– मध्ये
फॉरमल पॅन्टस्, जीन्स Rs.300/- पासुन पुढे
हाप व फुल जेन्टस् क्राडसेट Rs.300/- मध्ये उपलब्ध 7XL पर्यंत
फक्त पुरुषांसाठी जेन्टस् शर्ट, नाईट पॅन्ट, टि शर्ट, ट्राऊझर Rs.200/- पासुन पुढे
कार्गो पॅन्ट Rs.250/-
लेडिज व जेन्टस् वॉचेस (घड्याळ) Rs.100/-
जिन्स व फॉर्मल पॅन्ट ४४ साईज पर्यंत व कॉटन पॅन्ट ३८ साईज पर्यंत उपलब्ध
तसेच डिझायन, चेक्सचे शर्ट व व्हाईट शर्ट 7XL साईज पर्यंत उपलब्ध
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही
मयुरी लेडिज मॉलच्या वर
शुभ मॉल
वेळ- दुपारी १२ ते सायंकाळी ७ पर्यंत
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अ.नगर 9028201188
Terms & Conditions Apply.



सर्व प्रकारचे गिझर, पाइप, पंप आणि इतर अनेक उत्पादने उपलब्ध!
GI, CPVC, UPVC SWR पाइप व फिटिंग, सर्व प्रकारचे पंप, सोलर, सॅनेटरी, गॅस, सॅनिटरी, बाथ फिटिंग.
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जिल्ह्यात पुन्हा वीजांच्या कडकडाटासह वादळ, वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता

नगर - भारतीय हवामान विभागाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी पुन्हा वीजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याच्या वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता वर्तविली आहे. ३ एप्रिल रोजी जिल्ह्यात तुरळक ठिकाणी वीजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याच्या वाऱ्यासह गारपीट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तसेच ४ एप्रिल रोजी वीजांच्या कडकडाटासह वादळ, मध्यम पाऊस व जोरदार वाऱ्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

मेघगर्जना, वीजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याच्या वेळी झाडाखाली थांबू नये; सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. वादळादरम्यान कोणतेही विद्युत उपकरण वापरू नये; विद्युतवाहक वस्तूंना स्पर्श टाळावा. मोकळी मैदाने, टॉवर्स, विद्युत खांब, धातूची कुंपणे, ट्रान्सफॉर्मर यांपासून दूर राहावे. जाहिरात फलकाजवळ थांबू नये; कोसळण्याचा धोका संभवतो. मोकळ्या जागेत अडकले असल्यास गुडघ्यावर बसून डोके खाली झाकून घ्यावे व जमिनीशी कमी संपर्क ठेवावा. धरण, नदी, कालवे येथे पर्यटनासाठी जाताना विशेष काळजी घ्यावी; पाण्यात उतरू नये व धोकादायक ठिकाणी सेल्फी घेऊ नये.शेतकऱ्यांनी पाऊस व गारपीटीमुळे नुकसान टाळण्यासाठी शेतीमालाचे योग्य नियोजन करावे. बाजारात आणलेला किंवा साठवलेला शेतीमाल सुरक्षित ठेवण्याची खबरदारी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. नागरिकांनी स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. आपत्कालीन परिस्थितीत जवळच्या पोलीस स्टेशन, तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर येथे टोल फ्री क्रमांक १०७७ तसेच ०२४१-२३२३८४४/ २३५६९४० वर संपर्क साधावा

# राहुरी पोटनिवडणूक लढविण्याबाबत तनपुरेंचे तळ्यात-मळ्यात, काँग्रेस पक्ष उमेदवार देण्याच्या तयारीत, प्रदेशकडे पाठवली नावे

नगर - स्व. आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर रिक्त झालेल्या राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. महाविकास आघाडीत ही जागा राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडे आहे. महायुतीकडून भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. मात्र, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या उमेदवारीविषयी विविध तर्कवितर्क लढविण्यात येत आहेत. त्यामुळे तनपुरे यांनी जर ऐनवेळी माघार घेतली किंवा अपक्ष उमेदवारी केली तर काँग्रेस पक्षाने महाविकास आघाडीचा उमेदवार देण्याची तयारी केली आहे. राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास इच्छूक असलेल्यांची नावेही प्रदेश कमिटीला कळविण्यात आली असल्याचे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांनी सांगितले.

राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघासाठी १ एप्रिलपासून उमेदवारी अर्जांची विक्री सुरु करण्यात आली आहे. आत्तापर्यंत १०२ उमेदवारी अर्ज ५९ इच्छूकांकडून घेण्यात आले आहेत. तर एक उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या निवडणुकीसाठी भाजपाकडून अक्षय कर्डिले यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. मात्र, तनपुरे यांच्याकडून विजयाचा दावा करीत भाजपाकडे उमेदवारी मागितली असल्याची चर्चा आहे. मात्र, अद्याप कर्डिले व तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलेला नाही. माजी मंत्री प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी शरद पवार पक्ष सोडण्याच्या मनस्थितीत असल्याचे सांगण्यात येते. तनपुरे अपक्ष उमेदवारी करतील किंवा भाजपमध्ये जातील, अशाही चर्चा सुरु आहेत. तनपुरे यांनी मात्र, याबाबत अद्याप काहीही खुलासा केलेला नाही. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून तनपुरे यांची हिंदुत्ववादी भूमिका प्रखरतेने समोर आली आहे. तनपुरे यांनी काही दिवसांपूर्वी जनआशिर्वाद यात्रा काढली होती. त्यावेळी त्यांनी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे तुतारी चिन्ह कोठेही वापरले नव्हते किंवा त्यांनी पक्षाचे नावही वापरले नव्हते. तसेच त्यांनी डोक्यात भगवी टोपी घातलेली होती. त्यामुळे तनपुरे हे भाजपमध्ये जातील किंवा हिंदू मते मिळविण्यासाठी अपक्ष उमेदवारी करतील, अशी चर्चा राहुरीत रंगलेली आहे. तनपुरे हे जर अपक्ष उभे राहिले तर काँग्रेस व उद्धव ठाकरे शिवसेना हे महाविकास आघाडी म्हणून उमेदवार देणार आहेत. तशी तयारी काँग्रेसने केली आहे. काँग्रेसच्या प्रदेश कमिटीकडून राहुरीतून कोण कोण इच्छूक आहेत, याबाबत माहिती मागविली होती. काँग्रेसकडून सुरेश लांबे, मकासरे, ॲड. म्हसे यांची नावे प्रदेशकडे पाठविल्याचे सांगण्यात आले. त्यास गुजर यांनी दुजोरा दिला आहे. त्याचवेळी शिंदे शिवसेनादेखील राहुरीची निवडणूक लढणार असल्याचे सांगण्यात येते. शिंदे शिवसेनेकडून रावसाहेब खेवरे हे निवडूक लढविण्यास इच्छूक असल्याचे आहेत.

# रायसोनी पतसंस्थेच्या ठेवीदारांची नगर शहरात ६ एप्रिल रोजी सभा

नगर - शहर व जिल्ह्यातील रायसोनी पतसंस्था, जळगाव या पतसंस्थेत ज्यांनी आपल्या कष्टाचा, श्रमाचा पैसा मुदतठेवीत गुंतवला आहे, परंतू अद्यापही अशा ठेवीदारांना ठेवीचा एकही हप्ता मिळालेला नाही. अथवा अजुनही या ठेवी या पतसंस्थेत शिल्लक आहेत, अशा सर्व ठेवीदारांची सभा ६ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती आयोजक मधुकर शंकर जाधव व डि. एम. कुलकर्णी यांनी दिली.

या पतसंस्थेमध्ये ठेवलेल्या ठेवींची ठेवीदारांनी अनेकदा मागणी करूनही रकमा मिळालेल्या नाहीत. त्या परत मिळवून देण्यासाठी परत एकवार रायसोनी पतसंस्था ठेवीदारांसाठी नव्याने जागर करण्यात येत आहे. त्यासाठी ही सभा ६ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता बाळासाहेब देशपांडे (सिद्धीबाग) उद्यानात आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली.

या पतसंस्थेतील ज्या ठेवीदारांना ठेव रकमा मिळालेल्या नाहीत, अशा ठेवीदारांनी आपल्याजवळील ठेवपावत्यांच्या झेरॉक्स प्रती घेऊन या सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# श्रीमंताच्या घरात पाईपने गॅस आणि गोरगरीब जनतेला उपाशी ठेवण्याचा घाट गरीब-श्रीमंत भेदभाव? पालकमंत्री आणि लोकप्रतिनिधींना मान्य आहे का ?

## अन्यथा काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल : शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण

नगर - नगरसेवकांचा विरोध डावलून शहरात गॅस पाईपलाईन टाकायला परवानगी देण्यावरून अहिल्यानगर महानगरपालिकेची मनमानी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आयुक्त यशवंत डांगे यांची एकतर्फी भूमिका आता जनतेसमोर उघडी पडली आहे. नगरसेवकांचा स्पष्ट विरोध असतानाही रस्ते खोदाईला परवानगी देणे म्हणजे यांची मनमानी आहे. गॅस पाईपलाईन टाकण्यात गरीब श्रीमंत असा भेदभाव करण्यात येतो आहे. श्रीमंताच्या घरी पाईप गॅस आणि गोरगरीब जनतेला उज्वलाच्या रिकामे सिलेंडर असा घाट कंपन्यांनी घातला आहे. या विरोधात काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी पत्रक काढून निषेध नोंदवला आहे.

शहरात २०० कोटी रुपयांचे काँक्रीट रस्ते झालेले असताना या ठिकाणी विनाशुल्क रस्ते खोदायला परवानगी देऊन शहर पुन्हा नांगरून ठेवायचे का? स्थानिक नगरसेवकांचा विरोध असताना पालिकेने विनाशुल्क परवानगी देणे कोणत्या कायद्यात बसते? याबाबत नुसता विरोध काही उपयोगाचा ? नगरसेवकांनी याबाबत महासभेत ठराव मंजूर करावा. तरच ही रस्ते खोदाई थांबेल. जर महासभेने केलेला ठराव बेकायदेशीर आहे. असे आयुक्त डांगे यांना वाटले तर त्यांनी हा ठराव शासनाकडे विखंडित करण्यासाठी पाठवावा. मंध्यंतरी जानेवारी २०२५ मध्ये खासदार निलेश लंके यांनी महापालिकेत येऊन या गॅस कंपन्या आणि आयुक्त यशवंत डांगे यांची बैठक घेऊन मध्यस्थी केली होती. सवलतीच्या दरात गॅस कंपन्यांना खोदाईसाठी कंपन्यांना पालिकेने परवानगी द्यावी असे लंके यांनी म्हंटले होते. पण आयुक्त डांगे यांनी आपल्याला हे दर परवडत नाही असे म्हणून हा प्रस्ताव झिडकारला होता. मग आता आयुक्त डांगे यांना ही निशुल्क खोदाई कशी परवडते ? चार वर्षांपूर्वी ज्या दोन गॅस कंपन्यांनी गॅस प्रकल्पात सामाजिक भेदभाव केला. त्याबद्दल काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. शहरात खोदाई केली, त्यांनी फक्त उच्चभ्रू आणि श्रीमंत वस्त्यांमध्येच काम केले.

राज्य शासनाने काढलेल्या निर्णयानुसार भारत गॅस कंपनीने प्रभाग क्रमांक एक, दोन, चार व पाच या प्रभागातील तसेच प्रभाग क्रमांक सहा, सात, सोळा या प्रभागांमध्ये नव्याने १२५ परवानगी दिली. यात प्रभाग क्रमांक वगळण्यात आला. तसेच मुस्लिम चावडी, कोठला, पारशाह खुंट,



जुन्या परवानग्यांना मुदतवाढ दिली. आठ, नऊ, अकरा, चौदा व किलोमीटर च्या रस्ता खोदाईसाठी तीन मुकुंदनगर हा भाग जाणून बुजून बहुल वस्तीचा झेंडीगेट, पंचपीर तसेच सिद्धार्थनगर, दलित वस्ती, २९ घोषित झोपडपट्ट्या या भागांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले. या संदर्भात संबंधित गॅस कंपन्या या भागात पाईप लाईन टाकण्यास इच्छुक नाहीत. कारण या भागात आपल्याला प्रतिसाद मिळणार नाही असा कयास त्यांनी बांधला आहे. तो कुठल्या आधारावर ? असे दीप चव्हाण यांनी विचारले आहे.

हा केवळ प्रशासनाचा निष्काळजीपणा नाही, तर सामाजिक अन्याय आहे. गरीब, दलित आणि इतर धर्मीय बहुल वस्त्यांना ही सुविधा मिळू नये, अशीच रचना करण्यात आली का? असा सवाल यांनी दीप चव्हाण यांनी विचारला आहे.

सध्या युद्धजन्य परिस्थिती आहे. गॅस सिलेंडरचा तुटवडा आहे. त्यावर तोडगा म्हणून शासनाने पाईपलाईन द्वारे गॅस देण्याची योजना प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. येत्या ३ महिन्यात हे पूर्ण करा असे शाशनाने आदेशात म्हंटले आहे. पण तीन महिन्यात हे पूर्ण होणे शक्य नाही.

राज्यात महायुतीचे सरकार आहे. आणि पालिकेतही महायुतीची सत्ता आहे. अशा परिस्थितीत स्थानिक नगरसेवकांनी केलेला हा विरोध सत्ताधारी पालकमंत्री आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांना मान्य आहे का ? असा सवाल दीप चव्हाण यांनी विचारला आहे.

गॅस पाईपलाईन ची खुदाई शहरात २०२१ पासून चालू आहे. पालिकेने परवानगी दिल्यानंतर हा प्रकल्प पूर्ण होईल पण पाईपलाईन द्वारे गॅस फक्त श्रीमंताच्या घरी जाईल.

केंद्र सरकारने प्रधानमंत्री उज्वला योजना अंतर्गत गोरगरीब जनतेला गॅस दिला, पण त्यामागे कोणतीही दीर्घकालीन योजना नव्हती. गॅस सिलेंडरचा खर्च परवडत नाही, ही वस्तुस्थिती आहे. गरीबांच्या माथी बोजा टाकून आता पाईपलाईन गॅसचा गाजावाजा केला जात आहे. पण हा पाईपलाईन गॅस नेमका कुठे जाणार? पुन्हा त्याच श्रीमंत भागात? गरीब वस्ती पुन्हा वंचित राहणार? जर असेच होणार असेल, तर हा प्रकल्प जनतेसाठी नाही, तर काही मोजक्या लोकांसाठी आहे, हे स्पष्ट आहे.

आयुक्त यशवंत डांगे यांनी शासन आदेशाचा हवाला देत निर्णय घेतला, पण स्थानिक परिस्थिती, सामाजिक समतोल आणि जनतेचा आवाज पूर्णपणे डावलला. प्रशासनाचा हा 'टॉप-डाउन' ॲप्रोच आता चालणार नाही. आमचा स्पष्ट इशारा आहे की रस्ते खोदाई आणि गॅस पाईपलाईन प्रकल्पात सर्व समाजघटकांना समान न्याय मिळालाच पाहिजे. अन्यथा काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.

राष्ट्रवादी अजित पवार गटाचे महापौर यावर निर्णय देत नाहीत. पण भाजपाचे उपमहापौर आणि नगरसेवक पाईप गॅस साठी रस्ते खोदाई याला कडाडून विरोध करीत आहेत. आणि आयुक्त केवळ बघ्याची भूमिका घेत आहेत. तसेच काँक्रीट रस्ते झाल्यानंतर पुन्हा गॅस साठी खोदून ठेवायचे आणि नंतर पुन्हा रस्ते करायचे ? या अगोदर अमृत योजना भुयारी गटार करण्यासाठी चांगले काँक्रीट चे रस्ते असेच उखडण्यात आले होते. मग नगरकरांच्या नशिबी १० ते १५ वर्षांपासून रस्त्यांची रखडलेली कामेच कायमस्वपूरपी आहेत का ? की हे रस्ते कामासाठी वारंवार निधी लाटण्याचे षडयंत्र आहे का याचा खुलासा संबंधितांनी करावा असे दीप चव्हाण यांनी म्हंटले आहे.

# पारिजात चौक ते तपोवन रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम अनेक महिन्यांपासून रखडले, संथ गतीमुळे नागरिक त्रस्त

## महापौर ज्योतीताई गाडे यांनी पाहणी करत ठेकेदाराला काम तातडीने पूर्ण करण्याचे दिले आदेश, नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन कामाचा वेग वाढवा

नगर - अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील पारिजात चौक, एकविरा चौक ते तपोवन रोड दरम्यान सुरू असलेल्या रस्ता काँक्रिटीकरणाच्या कामाची महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून कामाचा आढावा घेतला. गेल्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या या कामाच्या संथ गतीमुळे परिसरातील नागरिक त्रस्त झाले असून दळणवळणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.



पारिजात चौक ते तपोवन रोड रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाबाबत अधिकाऱ्यांशी चर्चा करताना करताना महापौर ज्योती गाडे आदी. (छाया : लहू दळवी)

महापौरांनी यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांनी महापालिका प्रशासन व ठेकेदार एजन्सीविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. काम काही महिन्यांपासून सुरू असून मधल्या काळात ते पूर्णपणे बंद होते. त्यामुळे रोजच्या वाहतुकीसह विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे, असे नागरिकांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रशासन व ठेकेदार एजन्सीला कडक सूचना देत रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले. नागरिकांचे प्रश्न लक्षात घेऊन कामाचा वेग वाढवावा व दर्जेदार काम करून लवकरात लवकर रस्ता पूर्ण करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

काम पूर्ण झाल्यानंतर या भागातील दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल तसेच परिसराला सुशोभीकरणाचे स्वरूप प्राप्त होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी शहर अभियंता मनोज पारखे, नगरसेवक निखिल वारे, ऋग्वेद गंधे तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# अहिल्यानगर शहरात ४ एप्रिल रोजी विराट हिंदू संमेलन व कलश शोभायात्रा

नगर - तोफखाना व नालेगाव व कल्याण रोड परिसरातील नागरिकांच्या वतीने ४ एप्रिल रोजी सायं. ५ वाजता रोजी विराट हिंदू संमेलन व कलश शोभायात्रेचे आयोजन दिल्लीगेट वेस, शनी मंदिर, अहिल्यानगर या ठिकाणी करण्यात आले आहे. या विराट हिंदू संमेलनामध्ये मार्गदर्शन करण्यासाठी रामायणाचार्य, भागवताचार्य, शिवचरित्र व्याख्याते तथा सद्गुरु नारायणगिरीजी गुरुकुलचे संस्थापक ह.भ.प.नवनाथ महाराज म्हस्के, आशुतोष महादेव देवस्थान चे ह.भ.प.राहुल महाराज दरंदले प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तर यावेळी प्रमुख वक्ते रा.स्व.संघ धर्म जागरण प्रांत मंडळ सदस्य (प्रांत परियोजना प्रमुख) सुनिल काळे हे मार्गदर्शन करणार आहेत.




शोभा यात्रा सायंकाळी पाच वाजता श्री राम मंदिर, नेता सुभाष चौक ते दिल्लीगेट वेस पर्यंत आयोजित करण्यात आली आहे. महिलांनी डोक्यावर कलश घेवून शोभायात्रेत सामील व्हावे. तसेच परिसरातील सर्व नागरिकांनी या हिंदू संमेलनात उपस्थित राहावे. असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अहिल्यानगर शहरात हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हिंदू समाजातील प्रत्येक बांधव व भगिनींनी कुटुंबासह उपस्थित रहावे. संमेलनानंतर महाप्रसादाची व्यवस्था केली आहे.

# वाल्मिक साळुंके यांचे हृदयविकाराने निधन



श्रीरामपूर - कोल्हापूर येथील गायक वाल्मिक फकिरा साळुंके (वय ५६) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक भाऊ, दोन मुले, एक मुलगी, सून असा परिवार आहे. संगीत क्षेत्रातील कलाकार सोमनाथ साळूंके यांचे थोरले बंधू, रितेश व राहुल साळुंके याचे वडील होत.

# महिलेचे खाजगी फोटो फेसबुकवर व्हायरल; 'जय ओबीसी' पेजसह बारवकरवर गुन्हा

नगर - सोशल मीडियाच्या माध्यमातून एका सामाजिक संघटनेत काम करणाऱ्या महिलेची बदनामी केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात जय ओबीसी या फेसबुक फेज सह हर्षवर्धन बारवकर या फेसबुक खातेधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ३५ वर्षीय पिडीत महिलेने फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला आणि त्यांच्या ओळखीचे दत्तात्रय खेमनर यांनी संमतीने काढलेले खाजगी फोटो 'जय ओबीसी' या फेसबुक पेजवर आणि हर्षवर्धन बारवकर याच्या खात्यावरून अनधिकृतपणे प्रसारित करण्यात आले. २७ मार्च रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास हा प्रकार उघडकीस आला. याबाबत ची माहिती मिळाल्यावर पिडीत महिलेने २ एप्रिल रोजी नगरच्या सायबर पोलिस ठाण्यात धाव घेत फिर्याद दिली. फिर्यादी महिला आणि त्यांच्या ओळखीचे दत्तात्रय खेमनर यांनी परस्पर संमतीने काही फोटो (सेल्फी) काढलेले होते. सदरचे खाजगी फोटो या फेसबुक पेजेस आणि खात्यावरून अनधिकृतपणे प्रसारित करून त्यांच्या वैयक्तिक गोपनीयतेचा भंग केल्याचा ठपका आरोपींवर ठेवण्यात आला आहे. आपली बदनामी करण्याच्या आणि एकांतपणाचा भंग करण्याच्या उद्देशानेच हे कृत्य केल्याचे फिर्यादीने तक्रारीत म्हटले आहे.

याप्रकरणी 'जय ओबीसी' (Jay Obc) नावाचे फेसबुक पेज आणि हर्षवर्धन बारवकर या फेसबुक खातेधारकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ७७ आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ (ई) नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेमुळे खळबळ उडाली असून सोशल मीडियाचा गैरवापर करणाऱ्यांविरुद्ध सायबर पोलिसांनी तातडीने पावले उचलली आहेत.

या गुन्ह्याचा पुढील तपास सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले हे स्वतः करत आहेत.

# वारंवार गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या टोळीवर संघटीत गुन्हेगारीचे वाढीव कलम लावून केली कारवाई

नगर - कत्तलीसाठी गोवंशीय जनावरांची वाहतुक करणे, त्यांना चारापाणी न देता क्रुरतेने वागवणे, त्यांची कत्तल करणे, गोमांस ताब्यात बाळगुन विक्री करणे या प्रकारचे गुन्हे वारंवार करणाऱ्या भिंगारच्या सदर बाजार येथील टोळीवर भिंगार कॅम्प पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम १११ हे संघटीत गुन्हेगारीचे वाढीव कलम लावून कारवाई केली आहे.

असिफ ईकबाल कुरेशी, तन्वीर मोहम्मद कुरेशी दोन्ही (रा. सदर बाजार, भिंगार) अशी वाढीव कलम लावून अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. या दोघांवर २० मार्च रोजी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २७१, ३२५, १११, ३(५) सह महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ५ (अ), ५ (ब), ५ (क), ९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या आरोपींना १एप्रिल रोजी अटक करण्यात आलेली आहे. आरोपी असिफ ईकबाल कुरेशी हा टोळीचा म्होरक्या असुन तो त्याचे साथीदारांना एकत्र जमवुन स्वतःचे व टोळीचे आर्थिक फायद्याकरीता गोवंशीय जनावरांची वाहतुन करणे, त्यांना चारापाणी न देतो क्रुरतेने वागवणे, त्यांची कत्तल करणे, गोमांस ताब्यात बाळगुन विक्री करणे या प्रकारचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यांच्यावर यापूर्वी ही गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्यांच्यावर दाखल गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता कलम १११ हे संघटीत वाढीव कलम लावण्यात आलेले आहे.

सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. जगदीश मुलगीर, पो.हे.कॉ. दिलीप शिंदे व पो. कॉ. प्रमोद लहारे यांनी केली असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो.हे.कॉ. पांडुरंग बारगजे हे करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### उन्हाळ्यात शरीराला ठेवा ठंड

उन्हाळ्याच्या कडाक्याच्या उन्हात अंगाची लाहीलाही होते आणि शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ लागते. अशा वेळी शरीराला नैसर्गिकरीत्या थंड ठेवण्यासाठी 'दही' हा सर्वोत्तम पदार्थ आहे. रोजच्या आहारात दह्याचा समावेश केल्याने केवळ थंडावाच मिळत नाही, तर आरोग्याला इतरही अनेक फायदे होतात. दही शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास मदत करते. यामुळे उन्हाचा तडाखा बसण्याची शक्यता कमी होते. उन्हाळ्यात पचनशक्ती कमकुवत होते. दह्यातील 'गुड बॅक्टेरिया' पचन सुधारतात आणि अपचन, गॅस यांसारख्या समस्या दूर ठेवतात. दह्यात पाण्याचे प्रमाण भरपूर असते, ज्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी टिकून राहते. प्रतिकारशक्ती: उन्हाळ्यात येणारा थकवा दूर करून दही शरीराला ऊर्जा देते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवते. दही खाल्ल्याने शरीरातील उष्णता कमी होते, ज्याचा सकारात्मक परिणाम त्वचेवर होतो आणि पुरळ किंवा घामोळ्यांचा त्रास कमी होतो. शक्यतो ताजे आणि घरी लावलेले दही खावे.

## पाककला

### गुलाब जामुन कस्टर्ड

**साहित्य** : दूध, कस्टर्ड पावडर २५ ग्रॅम, साखर ११० ग्रॅम, वेलचीचे दाणे

**कृती** : सर्वात आधी एका भांड्यात ८० मिली दूध आणि २५ ग्रॅम कस्टर्ड पावडर घाला आणि चांगले मिसळा. नंतर ते एका बाजूला ठेवा.आता पॅनमध्ये एक लिटर दूध घाला आणि ते गरम करा. नंतर त्यात तयार केलेले कस्टर्ड मिक्सर घाला, ढवळून मंद आचेवर ते घट्ट होईपर्यंत शिजवा.

तसेच साखर आणि वेलचीचे दाणे घाला चांगले मिसळा आणि १ तासासाठी फ्रीजमध्ये ठेवा. आता तयार कस्टर्ड एका बाऊलमध्ये काढा व त्यात गुलाब जामून घाला. थंडगार नक्कीच सर्व्ह करा.

## वास्तू

### बाथरुम आणि निळा रंग

✼ नीळा रंग आनंद आणि शुभतेचे प्रतीक मानला जातो. वास्तुमध्ये नीळ्या रंगाला खुप महत्त्व दिले जाते. वास्तु शास्त्रानुसारनुसार बाथरुममध्ये निळ्या रंगाची बादली ठेवणे खुप शुभ मानले जाते.

✼ बाथरुममध्ये ठेवलेली बादली कधीच रिकामी राहणार नाही याकडे लक्ष ठेवा. बादली नेहमी स्वच्छ पाण्याने भरलेली असावी. असे केल्याने घरात सुख-शांति आणि समृद्धी राहते.

## सौंदर्य

रुटीनमध्ये समावेश करा जे त्वचेला आर्द्रता परत देण्यासोबतच तिला मॉइश्चरायझरसाठी तयार करतात, ज्यामुळे क्रीम अधिक चांगल्या प्रकारे शोषली जाते. सनस्क्रीन लावायला विसरू नका हवामान कसेही असो. हेच त्वचेला तरुण ठेवते.

## सल्ला

मच्छर अगरबत्तीचा धूर गर्भवती महिला आणि गर्भातील बाळ, दोघांच्याही आरोग्यावर परिणाम करू शकतो.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, स्वाती २१।३६, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : चांगले भोजन मिळेल. मौजमजेत दिवस व्यतीत होईल. एखाद्या महत्वाच्या व्यक्तीशी भेट झाल्याने आनंद होईल.

**वृषभ** : काळजीपूर्वक कार्य करा. नोकरीत असलेल्या व्यक्तींनी कार्यात सहकार्य घेऊन चालावे. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**मिथुन** : हातावर हात ठेवल्याने कोणतेही कार्य होत नाही. कोणत्याही कार्यात बेपर्वाईने वागू नका. आपल्या उतावीळ स्वभावाला आज नियंत्रीत करावे.

**कर्क** : शत्रू प्रभावहीन होतील. कार्यक्षेत्रात नवीन प्रोजेक्टची सुरूवात करण्यापूर्वी यथायोग्य विचार करा. पत्नीकडून उत्तम वैवाहिक सुख प्राप्ती होईल.

**सिंह** : वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील. मुले व पत्नीचा सहवास लाभेल. दिवस चांगला जाईल.

**कन्या** : कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. दिवस आनंदात जाईल. आपला चंचल स्वभाव मात्र स्थिर ठेवावा.

**तूळ** : भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होणे शक्य आहे. पैसे देण्याच्या बाबतीत जपून वागावे लागेल.

**वृश्चिक** : वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल. आज कुणालाही आर्थिक मदत करू नका. वाहने व यांत्रिक उपकरणे सावधगिरीने हाताळावीत.


**धनु** : भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे. पैसे बुडण्याची शक्यता अथवा फसवणूक होऊ शकेल.

**मकर** : सामान्य स्थितीत मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात. महत्त्वाची कामे आज करू नयेत. सार्वजनिक ठिकाणी मानसन्मान मिळेल.

**कुंभ** : प्रेम व रोमांसच्या प्रकरणांमध्ये यश मिळेल. मित्र आपणास मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील.

**मीन** : कामात अडचणी येण्याची शक्यता आहे. काळजीपूर्वक कार्य करा. जुनी मित्र-मैत्रिणी भेटतील. आपला प्रामाणिक स्वभाव असल्यामुळे कामे पूर्ण होतील.

## शब्दगंध क्र. ७४०१ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) 'मॅनेजर'चे मराठी रूप; कारभारी ५) तुकडा; अनेक देशांचा समुच्चय ६) दुसऱ्यावर अवलंबून असणारा ८) समोरासमोरची लढाई १०) प्रयोजन; निमित्त; सबब ११) एक धान्य; जव; सातू १२) अगणित; असंख्य; अनंत १३) सारखा; बरोबर; पंचप्राणांपैकी एक १४) तीन वेळेस १७) तस्कर; चोरी करणारा १८) एक वृक्ष; वडाचे झाड २०) पिकांवर पडणारा एक रोग; खवा २१) उत्तराधिकारी; हक्कदार २२) माणसे; लोक २३) अंकुर; कोंब; मोड २४) चंचल; क्षणिक; पातळ

**उभे शब्द :-** १) धंदा; उद्योग; वाणिज्य २) स्थिर करण्याची क्रिया; नेमणूक; प्राणप्रतिष्ठा; फाउंडेशन ३) चार वाणींपैकी एक ४) मिठी; आलिंगन ५) निश्चयी; पक्का; धैर्यवान ७) रावण ९) धन; वित्त; संपत्ती १२) अविरत; सतत; निरंतर; नित्य १५) मुस्लिमांची प्रार्थना १६) जंगलाला लागलेली आग; वणवा १७) लिहिण्यासाठी असणारे कागदांचे टाचण; वही १९) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र

**शब्दगंध क्र. ७४०० चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२३० चे उत्तर**



# ✼ ✼ ✼ ✼ ✼ ✼ मुलांचे विश्व ✼ ✼ ✼ ✼ ✼ ✼

**सुविचार** : कर्म जेव्हा वसुलीला येत तेव्हा कोणाचाच वशिला चालत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### मेष (Aries) राशीला मेष म्हणजे मेंढ्याचं नाव कसं मिळालं ?

आपलं अवकाश बारा राशींमध्ये वाटलं गेलं आहे. आता राशी म्हटलं की आपण ज्योतिषशास्त्राकडे वळतो आहे असं तुम्हाला वाटेलही, तर ते तसं नाही. आपण ॲस्ट्रॉनॉमी म्हणजे खगोलशास्त्राचा विचार करतो आहे.

अवकाशाचे एकूण ३६० अंश बारा भागात विभागले तर प्रत्येक राशीचे ३० अंश होतात. या ३० अंशाच्या तुकड्यामध्ये जे तारे-ग्रह नजरेस येतात, त्यांना काल्पनिक रेषांनी जोडून सहज ओळखू येईल अशी आकृती दिसते. त्यानुसार राशीला नाव दिलं गेलं आहे. प्रत्येक राशीसोबत काही कथा पुराणकथा- दंतकथा जोडल्या गेल्या आहेत. या कथांना ऐतिहासिक किंवा शास्त्रीय आधार आहे अथवा नाही याचा विचार न करता रंजक कथा म्हणून आपण त्याचा आस्वाद घेऊ शकतो.

मेष (Aries) ही या यादीतली पहिली राशी! मेष म्हणजे मेंढा किंवा इंग्रजीत Ram (रॅम)- या राशीसोबत जी ग्रीक पुराणातली कथा आहे आहे ती अशी - अगदी प्राचीनकाळी बॉयोटिया या राज्याचा अथामस नावाचा राजा होता. त्याला दोन बायका, एकीचं नाव नेफेले तर दुसरीचं नाव इनो. नेफेलेलीला दोन अपत्यं होती- एक मुलगा आणि एक मुलगी. मुलाचं नाव फ्रिक्सस आणि मुलीचं नाव हेली. अथामसची दुसरी बायको इनोफारच कपटी आणि ईर्ष्येखोर होती. तिला नेफेलेच्या मुलांपासून धोका वाटत असे म्हणून तिने एक कट रचला. एकदा राज्यात दुष्काळाची चिन्हं दिसायला लागली तेव्हा इनोने लोकांना सांगितलं की, झ्यूस हा देव रागावल्यानं दुष्काळ पडणार आहे. आपल्याला या आपत्तीपासून वाचायचं असेल तर फ्रिक्ससचा बळी द्यावा लागेल. हे ऐकून मुलांची आई नेफेले फार व्याकुळ झाली. तिने देवाची प्रार्थना केली. देवांनी तिच्याकडे एक सोनेरी केसांचा, पंख असलेला सोनेरी मेंढा (Golden Ram) पाठवला. या मेंढ्यावर फ्रिक्सस आणि हेली बसले आणि आकाशात उडू लागले. पण मेंढा दोघांना घेऊन जात असताना, हेलीचा अचानक खाली समुद्रात पडून मृत्यू झाला. त्या समुद्राला नंतर हेलेस्पॉन्ट (Hellespont - आजची Dardanelles सामुद्रधुनी) असे नाव मिळाले.

फ्रिक्सस मात्र सुरक्षित कोल्चिस (आजच्या जॉर्जिया देशात) या प्रदेशात पोहोचला. तिथल्या राजाने त्याचं स्वागत केलं. फ्रिक्ससने आभार म्हणून त्या सोनेरी मेंढ्याचा देवांना बलिदान दिले. या सोनेरी मेंढ्याला मरणोत्तर सन्मान म्हणून देवांनी त्याला आकाशात Aries नावाने तारकासमूहात स्थान दिलं. म्हणून आज Aries हे राशिचक्रातलं पहिलं चिन्ह आहे.

### सोबतीतील विश्वास

एक हरीण त्याच्या जलद धावण्याच्या आणि सौंदर्यासाठी प्रसिद्ध होते. त्याचे तेजस्वी डोळे आणि मखमली केस त्याला खूप आकर्षक बनवत होते. दुसरीकडे, शेळी साधी दिसणारी पण खूप बुद्धिमान आणि धीराची होती. तिच्या डोळ्यांत एक विशेष चमक होती, जी त्याच्या बुद्धिमत्तेचे लक्षण होते.

एके दिवशी, हरीण आणि शेळी नदीकाठी भेटले. ते पाणी पिण्यासाठी आले होते. हळूहळू, त्यांची घनिष्ठ मैत्री झाली. हरीणाने शेळीकडून कडून संयम आणि अडचणींना तोंड देण्याची कला शिकली, तर शेळीने हरीणाकडून वेगवान आणि अधिक चपळ होण्यासाठी काही युक्त्या शिकल्या.

एके दिवशी, एक धूर्त कोल्हा जंगलात आला, तो प्राण्यांना सापळ्यात अडकवून त्यांची शिकार करत होता. त्याने हरीण आणि शेळीमधील मैत्री पाहिली आणि त्याला वाटले की जर त्याने त्यांना वेगळे केले तर त्याची शिकार करणे सोपे होईल. कोल्हा प्रथम शेळीजवळ गेला आणि म्हणाला, शेळी, मी ऐकले आहे की हरीण तुझ्या पाठीमागे तुझी चेष्टा करतो आणि म्हणतो की तू खूप आळशी आहेस. शेळीला हे ऐकून खूप राग आला, पण तिने लगेच प्रतिसाद दिला नाही. तिने प्रथम हरीणाशी बोलण्याचे ठरवले.

मग कोल्हा हरीणाकडे गेला आणि म्हणाला, हरीण, तुला माहित आहे का की शेळी तुझ्याबद्दल असे म्हणते की तू फक्त तुझ्या सौंदर्याचा अभिमान बाळगतोस आणि कोणतेही काम करत नाहीस?

हे ऐकून हरीण देखील आश्चर्यचकित झाले. आता त्यांचे संभाषण थांबले. खूप दिवसांनी, जेव्हा हरीण आणि शेळी नदीकाठी भेटायचे तेव्हा त्यांनी कोल्हा त्यांच्याकडे पाहत हसताना पाहिला.

हरीणाने शेळीला विचारले, तुला खरोखर वाटते का की मी तुझी चेष्टा करत आहे? शेळीने उत्तर दिले, नाही, मला तसे वाटत नाही. पण कोल्ह्याने तसे म्हटले.

हरीण म्हणाला, माझ्या बाबतीतही असेच घडले. कदाचित कोल्ह्याने आपल्याला वेगळे करण्याची युक्ती केली असेल.

दोघांनाही कळले की हे सर्व कोल्ह्याची चाल आहे. त्यांनी त्यांची मैत्री पुन्हा जागृत करण्याचा आणि कोल्ह्याला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला.

हरीण आणि शेळीने एक योजना आखली. ते नदीकाठी गेले आणि भांडण्याचे नाटक केले. त्यांच्या कृती पाहणाऱ्या कोल्ह्याने त्यांच्याकडे जाऊन म्हटले, तुम्ही दोघे का भांडत आहात? हरीण म्हणाला, आम्ही दोघेही एकमेकांना कंटाळलो आहोत.

कोल्ह्याला आनंद झाला आणि त्याला वाटले की ती त्या दोघांनाही सहजपणे अडकवू शकते. पण कोल्ह्याने त्यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करताच, हरीण आणि शेळीने त्याच्यावर हल्ला केला. कोल्ह्याला त्यांचा सामना करता आला नाही. त्याने माफी मागितली आणि पुन्हा कधीही कोणालाही अडकवण्याचा प्रयत्न न करण्याचे वचन दिले. हरीण आणि शेळीने त्याला जाऊ दिले.

हरीण आणि शेळीची मैत्री आणखी घट्ट झाली. त्यांना कळले की खरे मित्र ते असतात जे एकमेकांवर विश्वास ठेवतात आणि कठीण काळात एकमेकांना सोडत नाहीत.

तात्पर्य : खऱ्या मैत्रीमध्ये विश्वास आणि समजूतदारपणा महत्त्वाचा असतो.

## जीवन का अमृत (भाग १)



५. अपने प्रश्न की ओर ध्यान दें-ईसा मसीह आपके अंतर में है। आप उन्हें कभी बाहर नहीं देख सकते। यदि आप उन्हें देखना चाहते हैं, तो आप अपनी आध्यात्मिक उन्नति के लिए रूहानी सत्संग में नामदान की अर्जी दें। आपको माँस, अंडे और शराब से सख्त परहेज करना होगा। यदि आप इन निर्देशों को मानेंगे और अंतर में उच्चतर मंडलों में जाने के लिए कड़ी मेहनत करेंगे, तो आप वहाँ ईसा मसीह से मिलेंगे ।

### बंधनों की जकड

दूसरों की सेवा करने के आपके विचार का स्वागत है । सर्वप्रथम, हमें अपने आप की सेवा करनी चाहिए और फिर औरों की। आप मन-माया के बंधन में हैं। आपकी आत्मा पर बहुत सारे पर्दे हैं, जैसे, भौतिक शरीर, सूक्ष्म शरीर, कारण शरीर, मन और माया इत्यादि। जब तक आप खुद इन बंधनों में जकड़े रहोगे, आप दूसरों की क्या सेवा कर सकते हैं? एक कैदी दूसरे कैदी को आजाद नहीं करा सकता। हममें से हर एक के अंतर में पाँच डाकू हैं और वे हमारे आध्यात्मिक खजाने को लूट रहे हैं। इन पाँच डाकुओं से बचने का तरीका है कि हम नामदान पायें और फिर उच्चतर मंडलों में पहुँचने के लिए कड़ी मेहनत करें। जब आप खुद को मुक्त कर लेंगे, तभी दूसरों को मुक्त कराने की कोशिश करना एक सच्ची सेवा होगी।

६. सत्गुरु की मीठी याद में अनायास ही आँसुओं का बह निकलना मन की सारी मैल को धो देगा । ७. जब कभी आप अकेला या खोया हुआ महसूस करें, तो सत्गुरु को प्रेम से याद करें एवं उससे दया की याचना करें और यह समय है, जब आप भजन-सिमरन में बैठ सकते हैं; इसे प्रेम तथा श्रद्धा के साथ करें । प्रभु को जाने वाला सच्चा रास्ता तब शुरू होता है, जब आप जिस्म-जिस्मानियत से ऊपर आते हैं । और कोई रास्ता नहीं है । इंसान वास्तव में बहुत महान है। वह प्रभु के हाथों से बनाए गए मंदिर (इंसानी शरीर) में स्वयं प्रभु के साथ रहता है। उसकी आत्मा, दिव्य जीवन के महासागर की एक बूँद है। (क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

सुरेश ओबेरॉय :
आणि तीच ऊर्जा नंतर माझ्याकडे परत येते.

शिवानीदीदी :
हो. समजा, तुम्ही माझ्याबद्दल वाईट विचार करत आहात आणि ते तरंग माझ्यापर्यंत पोहोचत आहेत. आता माझ्याकडे पर्याय उपलब्ध आहे. मी जर अज्ञानावस्थेत जगत असेन तर मीसुद्धा नकारात्मक विचार करायला सुरुवात करेन. पण जर मी सजग असेन तर असा नकारात्मक विचार करणं चुकीचं आहे हे मी ओळखेन आणि माझे विचार बदलेन. म्हणून तुम्ही माझ्याबद्दल जो विचार करत असाल त्याचा माझ्यावर एक तर, प्रचंड परिणाम होईल किंवा खूपच कमी परिणाम होईल किंवा काहीच परिणाम होणार नाही. हा सतत बदलत राहणारा घटक आहे. पण इतर कोणाहीपेक्षा ह्या नकारात्मक विचारांचा तुमच्यावर नक्कीच जास्त परिणाम होईल. तुम्ही तुमच्याच विचारतरंगांपासून वाचू शकणार नाही.

आपण विचारांपेक्षा शब्दांच्या पातळीवर हे समजून घेऊ या. समजा, तुम्ही मला म्हणालात की, तुम्हाला काहीच काम येत नाही. तुम्ही असं म्हणालात तरीसुद्धा ते ऐकल्यानंतर 'मी काय करायचं त्याची शक्ती फक्त आणि फक्त माझ्याकडेच आहे'; 'मी तुमच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करू शकते'. किंवा ते बोलणं स्वीकारून वाईट वाटून घेऊ शकते. किंवा तशाच शब्दांत तुमच्यावर हल्ला चढवू शकते.

हे सगळे पर्याय माझ्याकडे उपलब्ध आहेत. त्यामुळे जेव्हा तुम्ही मला असं म्हणता तेव्हा तुमच्या शब्दांमुळे होणाऱ्या परिणामांपासून मी स्वतःला वाचवू शकते. पण तुम्ही तुमच्या विचारांतून स्वतःला जे सांगता त्यापासून तुम्हाला कोणीच वाचवू शकत नाही.

सुरेश ओबेरॉय :
समजा, मी धूम्रपानाची सवय सोडवू शकत नाही म्हणून स्वत:वर सतत टीका करत असेन तर मी स्वतःची ऊर्जा कमी करून घेतोय का ?

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पक्या - सदाशिव पेठेत येतोस का...? रिक्षावाला - चाळीस रुपये होतील...?
पक्या - दहा रुपये देईल...! रिक्षावाला - दहा रुपयात कोण येणार...?
पक्या - मागे बसा. मी नेतो...!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✼ लोहखनिजाच्या निर्मितीत कोणते राज्य प्रथम स्थानी आहे?
- ओडीसा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### फणस

आठळीच्या पिठाचा वापर करावा. आठळीच्या पिठापासून खीरही बनविता येते. रुग्णांसाठी खीर बनवून तिचा वापर करावा.

५) फणसाचे गरे लहान मुलांच्या शक्तीप्रमाणे खाण्यास द्यावे. त्यांची शारीरिक व मानसिक वाढ चांगली होण्यासाठी याचा उपयोग होतो.

६) फणसाची मुळे अतिसारावर उपयोगी पडतात.

७) फणसाची आठळी भाजून खावी. ही फार चविष्ट व पौष्टिक असते. म्हणून शरीर दणकट व बलवान होण्यासाठी तिचा वापर करावा.

८) सांधे दुखत असतील, तर फणसाच्या कोवळ्या पानांनी शेकावेत. यामुळे सांध्यांवरची सूज कमी होऊन आराम मिळतो.

९) फणसाचा चीक शरीरावर जर बेंड आले असेल तर उपयोगी पडतो. या चिकामुळे बेंडाची सूज नाहीशी होऊन ते पिकते व त्यात असणाऱ्या पूचा निचरा होतो. १०) कृश व्यक्तींनी वजन वाढविण्यासाठी रोज फणसाचे ७-८ गरे खावेत किंवा त्याच्या आठळ्यांची खीर करून खावी.


सावधानता : फणस हे पौष्टिक असल्या कारणाने ते शारीरिक व मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी चांगले आहे, परंतु हे गरे फार खाल्ल्यास त्यामध्ये असणाऱ्या एन्झाईममुळे अपचन होऊन जुलाब होतात. सहसा फणस हे जेवण झाल्यावर खाऊ नये. म्हणून फणसाचे गरे खाल्ल्यानंतर त्यावर नागवेलीचे पान खाल्ल्यास पोट फुगते व खूप त्रास होतो. अशा वेळी लिंबूपाणी प्यावे. त्यामुळे पोटफुगी कमी होते. पोट जास्त भरलेले नसताना मधासोबत गरे खाल्यास बाधत नाहीत.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# बेवारस मराठी चित्रपटातून शिर्डीचा भूमिपुत्र बालकलाकार निहार गीते हा महत्त्वाच्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार

नगर – इंडियाज बेस्ट ड्रामेबाज या झी टीव्हीवरील रियालिटी शो तसेच विविध मराठी, हिंदी चित्रपटामध्ये आपले नाव लौकिक करणारा शिर्डीचा भूमिपुत्र बालकलाकार निहार गीते हा लवकरच पुन्हा एकदा दिवंगत अभिनेता विक्रम गोखले यांची प्रमुख भूमिका असलेल्या बेवारस या मराठी चित्रपटातून एका महत्त्वाच्या भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार आहे. या चित्रपटात आई साठी समाजाच्या विरोधात जाऊन न्यायालयीन लढाई लढण्याची संघर्षमय व हृद्यस्पर्शी, कथानक तसेच बाप्पा जोशी आणि तेजस्विनी पंडित यांच्या सारख्या दिग्गज कलाकारांची अनाथ मुलाच्या हक्काचा लढा लढण्यासाठीचा अनोखा युक्तिवाद पाहण्यासाठी हा चित्रपट लवकरच चित्रपट गृहात प्रदर्शित होणार आहे. निहार गीते, तेजस्विनी पंडित व बाप्पा जोशी हे तीन कलाकार कालाय तस्मै नमः या टीव्ही मालिके नंतर तब्बल तेरा वर्षांनी पुन्हा एकदा बेवारस या आगामी मराठी चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर एका अनाथ मुलाच्या हक्कासाठी संघर्ष करताना आपल्या उत्कृष्ट अभिनयातून या सामाजिक विषयाला मोठ्या पडद्यावर जिवंत करण्यासाठी सोबत दिसणार आहेत. मराठी रंगभूमी ते हिंदी व मराठी चित्रपटसृष्टीत उत्कृष्ट काम करणारे दिवंगत अभिनेता विक्रम गोखले यांची प्रमुख भूमिका असलेला 'बेवारस' हा त्यांचा अखेरचा चित्रपट लवकरच मराठी रसिकांसाठी सर्व चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे.




चित्रपटाची कथा व दिग्दर्शन विजय राणे यांची असून, पटकथा व संवाद लेखन शिरीष लाटकर यांनी केलेले आहे. गीतलेखन, छायांकन आणि संगीत दिग्दर्शन विवेक आपटे, युजीन डिसोजा, महेश कोळी आणि अमिर हडकर यांचे आहे. या चित्रपटात विक्रम गोखले यांच्यासह तेजस्विनी पंडित, रोहिणी हट्टंगडी, उषा नाईक, निहार गीते, ऋतुजा बागवे, उदय टिकेकर, विद्याधर जोशी, श्रीजीत मराठे आणि आदित्य देशमुख यांच्यासारखे दिग्गज कलाकार प्रेक्षकांना पडद्यावर पाहायला मिळणार आहेत.

बऱ्याच दशकानंतर एक सामाजिक विषय घेऊन हृदयस्पर्शी कथानक असलेला, संपूर्ण परिवारासोबत पाहण्यासारखा एक उत्कृष्ट चित्रपट, तसेच महानायक दिवंगत विक्रम गोखले यांचा शेवटचा अभिनय पाहण्यासाठी मराठी रसिकांची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. जे अनुभवण्यासाठी प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. विक्रम गोखले यांच्या निधनाच्या तीन वर्षानंतर त्यांचा हा अखेरचा मराठी सिनेमा संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होत आहे.

## विक्रम गोखले यांचा शेवटचा अभिनय प्रवास

२६ नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७७ व्या वर्षी विक्रम गोखले यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या निधनाच्या अगदी काही दिवसापूर्वीच त्यांनी बेवारस या मराठी चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले आणि या चित्रपटातील त्यांनी साकारलेले एक अनाथ आश्रम चालवणारे तत्त्वनिष्ठ आबाजी ची भूमिका प्रेक्षकांसाठी त्यांचा हृदयस्पर्शी अभिनय पाहण्याची शेवटची संधी ठरणार आहे. आबाजीं सोबत या चित्रपटाचे शूटिंग सुरु असताना शेवटी शेवटी त्यांनी आपण आजारी असल्याचे आम्हाला सेटवर कधीच जाणून दिले नाही असा अनुभव निहारणी यावेळी आमच्या प्रतिनिधी सोबत बोलताना सांगितला. बेवारस या आगामी मराठी चित्रपटाच्या संपूर्ण टीमला आमच्यातर्फे खूप खूप शुभेच्छा..!

## प्रेरणादायी अक्षरधन

### चैतन्यतत्त्व आणि पुरुषसूक्त







साने गुरूजींनी 'भारतीय संस्कृती' या पुस्तकात 'बुद्धिचा महिमा' या नावाचे एक प्रकरण लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, 'भारतीय संस्कृतीमध्ये विचारांचा महिमा सर्वत्र गायिलेला आहे. ही सेवा ज्ञानावर उभी आहे. वेद या शब्दाचा अर्थच ज्ञान आहे.'

जीवनाला सुंदरतेकडे नेणारा प्रत्येक विचार म्हणजे 'वेद' होय. या ऋग्वेदातील पुरुषसूक्त हे परमात्म्याचे वैश्विक रूप उभे करते. ऋग्वेदातील पुरुषसूक्त वाचल्यावर वैदिक ऋषींनी एकीकडे परमात्म्याला सर्वव्यापी रूपात पाहिले तर दुसरीकडे विश्वातील प्रत्येक चैतन्य हे परमात्मरूप असल्याने सर्वव्यापी चैतन्यशक्तिचेही दर्शन घडविले आहे. चैतन्यतत्त्व आहे म्हणूनच विश्वव्यवहारही आहे. हे चैतन्यतत्त्व विश्वाला पुरून उरले आहे.

'सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपत्' हा पुरुष सहस्रशीर्ष, सहस्राक्ष आणि सहस्रपाद आहे. त्याने सर्व भूमी तर व्यापलीच आहे शिवाय तो दहा अंगुले शिल्लक राहिला आहे. ऋग्वेदातील १६ ऋचांचे हे सूक्त म्हणजे परमेश्वराच्या विराट स्वरूपाचे वर्णन आहे. त्यामध्ये सृष्टीचा उत्पत्तीक्रम, यज्ञक्रम आणि कालक्रम याचे वर्णन आहे. निसर्गातील महानशक्ती या पुरुषरूप आहेत. सोम, अग्नी, सूर्य, सवित, पूषा, उषा, वायू, आप, पृथ्वी, द्युलोक या निसर्गातील शक्ती होत तर इंद्र, वरुण, बृहस्पती किंवा आदिती या निसर्गशक्तिने नियंत्रण करणाऱ्या देवता आहेत पण या देवता विशिष्ट निसर्गशक्तिशी एकरूप म्हणून ओळखता येत नाहीत. म्हणून या दोन्ही प्रकारच्या देवताविषयक भावनांना स्वतःमध्ये समाविष्ट करणारी 'पुरुष' ही संकल्पना वेदांमध्ये उद्भूत झाली.

पुरुषसूक्त हे त्याचे रूप होय. पुरुषसूक्तात या पुरुषाचे वर्णन विश्वरूप व विश्वातीत असे आहे. त्या पुरुषाच्या वर्णनासाठी वापरलेला 'सहस्र' हा शब्द केवळ संख्यावाचक नसून, असीम, अनंत, असंख्य, अगणित या अर्थाने योजण्यात आला आहे. विश्वाचे तत्त्व किंवा ईश्वर हा पुरुषरूप आहे. ही कल्पना ईश्वर केवळ निसर्गशक्तिरूप आहे असे न मानता निसर्गशक्तिलाही व्यापणारा आणि निसर्ग घटकांची व्यवस्था व क्रम लावणारा ईश्वर हा विश्वातील आहे. मनुष्याच्या रचनेची गुंतागुंतीची व्यवस्था आणि आश्चर्यमयता तसेच विश्वातील सर्व शक्तिंचा मनुष्याच्या ठिकाणी असलेला संगम परमपुरुषाची कल्पना वैदिक ऋषींना सुचली असावी.

– किशोर गांधी

कुंदन कांकरिया यांच्या स्मरणार्थ

# आनंदऋषीजी नेत्रालय तारकपूर शाखेत ४ एप्रिलला मोफत नेत्र तपासणी शिबिर



नगर – जैन सोशल फेडरेशनचे सक्रिय सदस्य स्व. कुंदन कांकरिया यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त आनंदऋषीजी नेत्रालयाच्या तारकपूर शाखेत ४ एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व उपचार मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १०.३० ते ६.३० यावेळेत नेत्र रोग तज्ज्ञ डॉक्टर या शिबिरात रूग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती नेत्रालयाचे प्रशासनाधिकारी आनंद छाजेड यांनी दिली.

जैन सोशल फेडरेशनच्या कार्यात हिरीरीने सहभाग नोंदवणाऱ्या स्व. कुंदन कांकरिया यांनी स्थापनेपासून नेत्रालयाच्या विस्तारात अमूल्य योगदान दिले. अंधत्व निर्मूलनासाठी ते सतत कार्यरत होते. आनंदऋषीची नेत्रालयात उच्च दर्जाच्या उपचार सुविधा मिळण्यासाठी ते कायम प्रयत्नशील राहिले. नेत्रालयात रूग्णांसाठी बैठक व्यवस्था, शेड, भोजन व्यवस्था उभारणीत योगदान दिले. त्यांनी देशातील अरविंद आय हॉस्पिटल येथे जाऊन. १० दिवस निवासी प्रशिक्षण व मास्टर प्लॅन निर्मितीचा सखोल अभ्यास केला. त्याद्वारे आनंदऋषीजी नेत्रालय येथे आवश्यक सेवा विस्तार केला. आनंदऋषीजी नेत्रालय येथील उच्च दर्जाच्या सेवेचा लाभ जास्तीत जास्त रूग्णांना मिळावा यासाठी त्यांनी सावेडी उपनगरांत तारकपूर येथे अद्ययावत शाखा सुरू करण्यात महत्वपूर्ण योगदान दिले.

आनंदऋषीजी नेत्रालयाने अल्प दरात सर्वसामान्य नेत्र रूग्णांना निर्दोष दृष्टी देण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालवले आहेत. नगरसह मराठवाड्यातील जिल्ह्यात नेत्रालयाचे १७ व्हिजन सेंटर कार्यान्वित आहेत. या माध्यमातून ग्रामीण भागातील रूग्णांसाठी वेळोवळी नेत्र तपासणी शिबिर घेऊन पात्र रूग्णांना नगरमध्ये आणून नेत्र शस्त्रक्रिया केल्या जातात. याकामी कांकरिया यांनी मोठे योगदान दिले आहे. नेत्रालयात आजतागायत १ लाखांहून अधिक यशस्वी नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. या शिबिरातून नेत्रालय येथील उपचार सुविधांचा लाभ रूग्णांनी घ्यावा अधिक माहितीसाठी संपर्क : ८६८६३०१५१५.

# सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेची यशस्वी रौप्य महोत्सवी वाटचाल

### सभासदांचा विश्वास आणि शिस्तबद्ध कारभारातून मोठी घोडदौड : अभय पितळे व शैलेश गांधी



नगर – सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्थेचे २ एप्रिल रोजी रौप्य महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. २५ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करताना संस्थेने शिस्तबद्ध कारभार करत स्वमालकीची इमारत साकारली तसेच सभासदांना दरवर्षी १५ टक्के लाभांश व ऑडीट अ वर्ग मिळवण्याची परंपरा कायम राखली आहे. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त लवकरच मोठा कार्यक्रम घेऊन सभासदांना संस्थामार्फत भेट देण्याचा मानस असल्याचे संस्थेचे चेअरमन अभय पितळे व व्हाईस चेअरमन शैलेश गांधी यांनी सांगितले.

सहकार महर्षी सुवालाल गुंदेचा यांनी २५ वर्षांपूर्वी अतिशय दूरदृष्टीने जैन ओसवाल पतसंस्थेची मुहूर्तमेढ रोवली. सर्वसामान्य व्यावसायिकांसाठी आर्थिक पत निर्माण करून त्यांना पाठबळ देण्यात पतसंस्थेने महत्त्वाची भूमिका बजावली. स्व. सुवालाल गुंदेचा यांनी सुरूवातीपासूनच शिस्तबद्ध कारभार करण्यावर भर दिला. त्यामुळे संस्थेने स्पर्धेच्या युगातही अतिशय चांगली वाटचाल करीत मोठी प्रगती केली. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात संस्थेकडे ९६ कोटी ३० लाख रूपयांच्या ठेवी असून कर्ज वाटप ७५ कोटी १० लाख रुपये आहे. एकूण कर्जापैकी सोने तारण कर्ज ४८ कोटी २५ लाख रुपये आहे. इतर बँकेतील ठेवी २८ कोटी २४ लाख रूपये आहेत. सीडी रेशो ७५.२८ टक्के आहे. भक्कम आर्थिक पायांवर पतसंस्थेची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

पतसंस्थेने स्थापनेपासून सभासदांना १५ टक्के लाभांश दिला आहे. ऑडिट 'अ' वर्ग कायम राखला आहे. सुरूवातीपासून कायम नफा मिळवण्याची कामगिरी पतसंस्थेने केली आहे. पतसंस्थेत सोने तारण, नजर गहाण, वेअर हाऊस कर्ज सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय सोने खरेदीसाठी कर्ज ही अभिनव कर्ज योजनाही राबवली जाते. कर्ज वसुलीसाठी सर्व संचालक मंडळ नेटाने प्रयत्न करते. परिणामी संस्थेची आर्थिक स्थिती अतिशय चांगली राहिली आहे.

ठेवींवरही आकर्षक व्याजदर देण्यात येतो. पतसंस्थेची शहराच्या मध्यवर्ती भागात स्वमालकीची प्रशस्त व दिमाखदार इमारत आहे. याठिकाणी अद्ययावत लॉकर सुविधा उपलब्ध आहे. सर्व सरकारी कर भरणा सुविधाही अत्यल्प कमिशन आकारून दिली जाते. संस्थेचे संपूर्ण कामकाज संगणकीकृत असून आधुनिक डिजिटल बँकिग सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संस्थेच्या मार्केट यार्ड शाखेतूनही व्यापारी वर्गाला जलद बँकिग सुविधा दिल्या जातात. व्यवसाय करतानाच पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम सातत्याने राबविले आहेत. सभासदांसाठी आयुष्यमान भारत कार्ड काढून देण्यासाठी विशेष शिबिर नुकतेच घेण्यात आले. रौप्य महोत्सवी वाटचालीत सभासदांचा विश्वास आणि पाठबळ मोलाचे ठरले आहे. या प्रदीर्घ यशस्वी वाटचालीत सर्व आजी माजी पदाधिकारी, संचालक यांचा मोलाचा वाटा असल्याचे चेअरमन अभय पितळे यांनी सांगितले.

# गुणवत्तेची वैभवशाली परंपरा कायम

### डॉ. रमेश झरकर यांचे प्रतिपादन; भारत विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

नगर – भारत विद्यालयाची गुणवत्ता ही मिरजगाव परिसरामध्ये आग्रक्रमाने ओळखली जाते ही गुणवत्तेची परंपरा विद्यालयाने कायम राखली आहे, असे प्रतिपादन विद्यालयाचे चेअरमन आणि हिंदसेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर यांनी केले.



भारत विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना डॉ. रमेश झरकर आदी.

विद्यालयामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी अरिहंत पतसंस्थेचे चेअरमन पंकज धोंगडे, जिल्हा ग्रामीण आरोग्य केंद्र मिरजगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ.दराडे, उद्योजक संजय बगाडे, गणेश झरकर, शालेय समिती सदस्य सौ. अर्चना गोरे आदींसह पालक उपस्थित होते.

मिळवलेल्या या उत्तुंग यशाबद्दल हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा आदींनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे मुख्याध्यापक किशोर खुरंगे यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी आणि शाळेच्या भौतिक विकासाच्या दृष्टीने राबवत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. भौतिक विकासाकरिता समाजातील दानशूर व्यक्तींकडून मिळत असलेल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

नुकत्याच घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. त्याबरोबरच नवोदय विद्यालया मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्येही विद्यालयाचा विद्यार्थी निवडला गेला आहे. NMMS परीक्षेमध्ये एकूण १९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी १५ विद्यार्थ्यांची या शिष्यवृत्ती करताना निवड झाली आहे. कु.पूर्वा वायाळ ही विद्यार्थिनी १४९ गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. तर नवोदय विद्यालयाकरिता विद्यालयाचा कार्तिक शिंदे हा विद्यार्थी निवडला गेला आहे.

या सर्वच विद्यार्थ्यांचा विद्यालया मार्फत पालकांच्या उपस्थिती मध्ये सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमाकरिता मोठ्या प्रमाणात पालक आणि मिरजगावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

विद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी संजय मुदगल यांनी सर्वच गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षीस देऊन त्यांचा गौरव केला आणि पुढील यशाकरता शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी बोलताना पंकज धोंगडे यांनी विद्यालयाच्या गुणवत्तेबाबत प्रगती बाबत समाधान व्यक्त केले. विद्यालयाच्या प्रगतीसाठी आपण सर्वतोपरी मदत करण्याचे मान्य केले. आपल्या मनोगतामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांच्या बक्षीसाकरिता ५१००० रुपये कायम ठेव ठेवून यामधून स्पर्धा परीक्षांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांना भरघोस बक्षीस देण्याचे जाहीर केले. त्याबरोबरच विद्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या सुशोभिकरणाचे काम लवकरच पूर्ण करण्याचे जाहीर केले.

विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. ज्यामध्ये कार्तिक शिंदे, अनुष्का गवारे, साक्षी बाबर, पूर्व वायाळ यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाबद्दल आणि शाळा राबवत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांसाठी आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे औचित्य साधून याप्रसंगाची आठवण म्हणून विद्यार्थ्यांनी शालेय परिसरामध्ये वृक्षारोपण केले. पालकांनीही या उपक्रमाला प्रतिसाद म्हणून शालेय परिसरात आणखी वृक्ष लागवडीचा मानस व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश फरताडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेंद्र नवले, कल्याण गवारे, गौतम रसाळ, अन्सार तांबोळी, विनोद देसाई, दादा शिंगाडे, साहेबा बोडखे, सौ. सुजाता खामकर, सौ. निशा गुंड हे सर्व शिक्षक प्रयत्नशील होते.

# 'पंडित जवाहरलाल नेहरू गुणवंत शिक्षक पुरस्कार' अहिल्यानगरच्या भाऊसाहेब कदम यांना प्रदान



तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व मोलाचे योगदान दिल्याबद्दल भाऊसाहेब लक्ष्मण कदम यांना पंडित जवाहरलाल नेहरू गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नगर – तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय व मोलाचे योगदान दिल्याबद्दल भाऊसाहेब लक्ष्मण कदम यांना पंडित जवाहरलाल नेहरू गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अल्पबचतभवन, जळगाव जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमात नंदूरबारचे उपजिल्हाधिकारी मनोज देशमुख यांच्या हस्ते कदम यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी सतीश बावीस्कर, जळगाव सोसायटीचे संचालक विजय पवार, माजी मुख्याध्यापक शब्बीर शेख, एकता संघटनचे अध्यक्ष फारुक शेख, पै. नाना डोंगरे, हकीम चौधरी, फारुक पटेल, संस्थेचे अध्यक्ष डॉ. जावेद शेख आदी उपस्थित होते.

भाऊसाहेब लक्ष्मण कदम हे टिळक रोड येथील ज्योत्स्ना उद्योग केंद्र सोसायटीच्या कार्यशाळेत शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून ते दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी केवळ शैक्षणिक मार्गदर्शनच केले नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करून त्यांना स्वावलंबी जीवनाकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित केले आहे.

कदम यांनी अनेक दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणत त्यांना आत्मनिर्भर बनविण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांत स्वतःचे स्थान निर्माण केले असून, समाजात सन्मानाने उभे राहण्याची ताकद मिळवली आहे. शिक्षणासोबतच व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्य प्रशिक्षण आणि पुनर्वसन यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. या दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी देत असलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांना पंडित जवाहरलाल नेहरू गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले.






शहरातील सकल राजस्थानी समाजाच्यावतीने ३० मार्च रोजी राजस्थान स्थापना दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी पोलिस इन्स्पेक्टर बेनीप्रसाद मिना आदी. शेजारील छायाचित्रात यानिमित्त एकत्रीत आलेले सर्व राजस्थानी समाज बांधव.

# अहिल्यानगरमध्ये राजस्थान स्थापना दिन साजरा

नगर – येथील सकल राजस्थानी समाजाच्यावतीने ३० मार्च रोजी राजस्थान स्थापना दिन साजरा करण्यात आला. त्याचे औचित्य साधून रेल्वे स्टेशन येथील आरपीएफ परेड ग्राऊंड येथे पोलिस इन्स्पेक्टर बेनीप्रसाद मिना यांच्या पुढाकाराने राजस्थान दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. समाजाने एकत्रीत येवून कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमामध्ये लोकगायन, राजस्थानी संस्कृती, वीर योद्धे, राजे महाराजे यांच्या शौर्यगाथांचे वर्णन करण्यात आले तसेच राजस्थानी वेशभूषांमध्ये राजस्थानी संस्कृतीतील नृत्यांचे नृत्ये सादर करण्यात आली.

या कार्यक्रमामध्ये तेजपाल बिष्णोई, ऑर्डिनरी लेफ्टनंट गंगाराम बिष्णोई, रेवतसिंग राजपुरोहित, चेनसिंग राजपुरोहित, गोपालसिंग शेखावत, विक्रमसिंग राजपूत, हिंमताराम देवासी, बस्तीराम चौधरी, मयुर सिंग, श्रीराम कुमावत, रमेश माली, किशोर उपाध्याय, गणेश पटेल, खेताराम चौधरी, मोहनलाल सुतार, बागाराम सुतार, दुर्गेश चौधरी तसेच सर्व समाजातील लोक उपस्थित होते. सर्वांनी मिळून कार्यक्रम उत्साहात पार पाडला. भोजनप्रसादीचा सर्वांनी आस्वाद घेतला. बाळगोपाळांसाठी खाऊचे वाटपही करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये महिला व युवतींची उपस्थिती लक्षणीय होती.

# वेळेत कागदपत्रे तयार ठेवा, विद्यार्थ्यांचे भवितव्य सुरक्षित करा

### नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर पालकांना महत्त्वाचे आवाहन; आवश्यक कागदपत्रे वेळेत काढण्याचे आवाहन



आनंद दळवी

नगर – १ एप्रिल २०२६ पासून नवीन शैक्षणिक वर्षास सुरुवात होत असल्याने दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर अखिल स्तरीय महा ई-सेवा केंद्र व आधार केंद्र संघटना, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष आनंद कैलास दळवी यांनी पालकांना आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक कागदपत्रे आधीच तयार ठेवावीत, असे त्यांनी स्पष्ट केले.

दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेताना जातीचा दाखला, उत्पन्न दाखला, रहिवाशी प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र यांसारखी कागदपत्रे अनिवार्य असतात. अनेकदा ही कागदपत्रे वेळेवर उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत अडथळे येतात. त्यामुळे पालकांनी आजच या सर्व कागदपत्रांची पूर्तता करून ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

याबाबत बोलताना आनंद दळवी म्हणाले की, दरवर्षी प्रवेशाच्या काळात पालकांची मोठी धावपळ होताना दिसते. कागदपत्रे अपुरी असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होते. त्यामुळे पालकांनी वेळेआधीच सर्व आवश्यक प्रमाणपत्रे काढून ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. ही छोटीशी काळजी विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी मोठी ठरू शकते.

ते पुढे म्हणाले, महा ई-सेवा केंद्रांमार्फत सर्व प्रकारची कागदपत्रे सुलभ पद्धतीने उपलब्ध करून दिली जातात. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठीही ही कागदपत्रे आवश्यक असतात. त्यामुळे पालकांनी शेवटच्या क्षणी गर्दी टाळण्यासाठी आजच पुढाकार घ्यावा आणि आपल्या मुलांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित करावे.

दरम्यान, या आवाहनामुळे अनेक पालकांमध्ये जागरूकता निर्माण होत असून, प्रवेश प्रक्रियेत होणारी धावपळ टाळण्यासाठी ही सूचना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे वेळेत उपलब्ध असणे ही काळाची गरज बनली असून, पालकांनी याबाबत सजग राहणे आवश्यक आहे.

# उच्चशिक्षीत महिलांनो चांगली पिढी घडवण्यासाठी कुटूंबाला तुमची खरी गरज आहे...

आज आपण पाहतो महिला उच्चशिक्षीत होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात त्या गगनभरारी घेऊन कमवू लागल्या. हे सगळ मान्य आहे आणि महिला घेत असलेली तिची गगनभरारी कौतुकास्पद आहे. पन सखे आज मनातील हितगुज करायच आहे ग मला तुझ्याशी.

सखे एक सांगू तुला सध्याचा काळ आपण पाहतो खूप भयानक आहे. या लेखाद्वारे मी तुझे खच्चीकरण तर मुळीच करनार नाही. पन आताच्या या काळामध्ये तुझ्या लेकरांना चांगले संस्कार देऊन त्यांना समाजातील एक चांगला भावी नागरीक घडवण्यासाठी घरामध्ये तुझी त्यांना जास्त गरज आहे. मान्य आहे महागाई भरमसाठ वाढली आहे. एकट्या बाबांच्या पगारावर घर चालवणे शक्य नाही. शिक्षणाचा खर्च न पेलवनारा आहे त्यामुळे घर चालवण्यासाठी दोघांनी नोकरी करणे कमावणे गरजेचे आहे. पन एक सांगू सध्याचा काळ पाहता या लेकरांना चिमुरड्यांना एका आईची घरात खुप जास्त गरज आहे. लहानपणासून तू त्यांना घरात राहून चांगले संस्कार शिकवले वाईट गोष्टींपासून दूर रहायला शिकवले तर ते त्यांना त्यांच्या जिवनात एक चांगला नागरीक म्हणून जगण्यासाठी फायदेशीर ठरेल. ही तू दिलेले संस्काराची शिदोरी त्यांना शेवटपर्यंत पुरेल. आणि हो मोबाईल पासून त्यांना सतत तू दूरच ठेव बाई. तुला त्या चिमुरड्याने त्रास देऊ नये म्हणून मोबाईल नावाचं त्याच आयुष्य शिक्षण उध्वस्त करणार खेळणे तर मुळीच त्याला देऊ नकोस. त्यापेक्षा त्याला मैदानी खेळ खेळण्यासाठी एखाद्या मैदानात घेऊन जात जा. वाचनालयामधे जाऊन त्याला पुस्तक वाचण्याची त्याच्यामधे आवड निर्माण कर. बालवयात तुत्याला जेवढ्या चांगल्या सवयी सोबत राहून लावशील त्या त्याला त्याचं आयुष्य जगताना खुप उपयोगी येतील. पन पैसा कमवण्यासाठी तू देखील जर घराबाहेर पडली तर या लेकरांकडे नक्कीच दुर्लक्ष होईल.

आज आपण समाजात जीवन जगताना पावलोपावली वाईट गोष्टी घडताना पहात आहोत. मोबाईलमुळे जग नको त्या गोष्टी समोर पाहून विकृत बनत चालले आहे. सर्वात जास्त चिमुरड्या लेकींना कोवळ्या कळ्यांना डोळ्यात तेल घालून आपल्याला या विकृत समाजापासून सुरक्षित ठेवून जिवापाड जपायच आहे. छत्रपती शिवाजी महाराजांना राजमाता जिजाऊंनी जसे घडवले तसे लक्ष आपल्याला आपल्या मुलांकडे द्यायचे आहे. राजमाता जिजाऊ नसत्या तर शिवबा घडले नसते आणि स्वराज्य निर्माण झाले नसते. म्हणजेच मुलांसाठी आई किती महत्वाची असते हे आपल्याला जिजाऊंनी दाखवून दिलेले आहे. आजच्या आधुनिक जिजाऊलाही उद्याची भावी उज्वल पिढी घडवण्यासाठी सुसंस्कृत पिढी घडवण्यासाठी पुढाकार घ्यावाचं लागनार आहे. आधुनिक युगातील उच्चशिक्षीत महिलांचे घराकडे दुर्लक्ष होत आहे. काही जणी रील्स बनवणे भिसी पार्टी यामधेच पुरत्या गुंतून गेलेल्या असतात नक्कीच तुम्ही तुमचे छंद जोपासा फिरायला जा पन घराकडे परिवाराकडे आपल्या माणसांकडे दुर्लक्ष होईल असे वागू नका. आपण पाहतो हल्ली दोघांच्या विचारांमध्ये ताळमेळ राहिलेला नसल्यामुळे कुटूंब विखुरले जात आहे. त्याचा परिणाम विशेषकरून लहान मुलांवर जास्त होताना दिसून येत आहे.

संसारामध्ये पुर्वी तडजोड होताना दिसून येत होती. कुठेतरी थांबायला हवे असे दोघांना वाटायचे आणि पुन्हा ते नव्याने संसाराला सुरुवात करायचे. आता पैसा भरमसाठ झालाय माणसाकडे. त्यामुळे दोघेही अहंकारात जगताना दिसून येत आहेत. कमीपणा कुणालाच घ्यायचा नसतो. मीपणा अंगी ठासून भरल्यामुळे तो नाते टिकवण्यात आडवा येत आहे. मुलीसुद्धा कोर्टकचेरी ला जास्त प्राधान्य देऊन दावा दाखल करून मुलाकडून भरमसाठ पैसा वसूल करायला प्राधान्य देतात पन तडजोड नकोच म्हणतात. पूर्वी मुली खूप सासुरवास सहन करायच्या आजही अनेक ठिकाणी मुलींना छळाला सामोरे जावे लागत आहे पण पुरुषांनीही त्यांच्या मर्यादेत रहायला हवे. कारण सासुरवास सहन करणाऱ्यातील ती स्त्रिजात आता राहिलेली नाही. तिला तिचे हक्क अधिकार कळायला लागले आहेत त्यामुळे तिचा आदर मान सन्मान करायला शिका तरचं तुमच्या घराला घरपण देणारी तुमच्या घराची शोभा वाढवणारी लक्ष्मी तुमच्या घरात टिकून राहील.

काळ खुप बदलला आहे आणि आगामी येणारा काळ हा खुप भयंकर असनार आहे त्यामुळे दोघांनीही कुटूंबव्यवस्था टिकावी यासाठी एकमेकांचा आदर करायला शिकावा. मतभेद झालेच तर ते दोघांमधेच शांततेत चार भिंतीच्या आत मिटवायला हवे. पन कोर्टकचेरीची पायरी चढण्याची वेळ कधी आयुष्यात येऊ देऊ नका. आणि हो आजच्या आधुनिक जिजाऊ तुझ्या चिखलाच्या गोळ्याला घडवण्यासाठी त्याला समज येईपर्यंत तरी तुझी त्याला घरी गरज आहे. घरातील नको त्या गरजा कमी करा आर्थिक नियोजन अचूक करा बरोबर संसाराचं गणित अचूकपणे सोडवता येईल. दोघांनीही अहंकार गर्व मीपणा सोडून दोघांच्याही आईवडीलांचा आदर करायला शिका कारण आजच्या या युगात घरामधे मुलांकडे लक्ष देणारे आजीबाबा हे प्रत्येक घरात असायलाच हवे.

आजची परिस्थिती पाहता घरात पैसा जास्त येतोय पन घरात माणस मात्र कमी होत चालली आहेत. आवर्जुन भेट घ्यायला जाणारी माणसं आता राहिली नाही. संवाद कमी होत चालला आहे मोबाईल वेडी दुनिया झाली आहे सगळी त्यामुळे माणूस माणसाशी बोलेनासा झाला आहे. मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत चालल्या आहेत त्या केवळ माणसाचा माणसाशी कमी होत चाललेल्या संवादामुळे आणि अतिप्रमाणात मोबाईल वापरामुळे. प्रत्येकाने फक्त आपला परिवार चांगला सुसंस्कृत घडवण्यासाठी प्रयत्न केले तर आपोआप सारा समाज सुसंस्कृत होईल. पहा पटतय का थोडतरी मनाला......



शब्दांकन :
**सौ. आशा सुधीर साठे,**
सैनिकपत्नी, अहिल्यानगर.
९६०४०५६९२८

# शबरीची करुणा व भक्ती म्हणजे अहिंसा, समर्पणाची महान परंपरा

## ह.भ.प.अभिमन्यू गिरी

नगर – तपोवन परिसरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहा भक्तीमय वातावरणात पार पडला. २ एप्रिल रोजी सकाळी काल्याच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता झाली. या धार्मिक सोहळ्यात परिसरातील भाविकांनी गर्दी केली होती. महिला भाविकांची उपस्थिती लक्षणीय होती.

ह.भ.प. चंद्रकांत महाराज खळेकर यांचे काल्याचे किर्तन झाले. दरम्यान ह.भ.प. अभिमन्यू गिरी महाराज यांनी शबरी हिच्या जीवनातील करुणा आणि भक्ती यांचा अत्यंत हृदयस्पर्शी उहापोह केला. या धार्मिक सोहळ्याने आणि भक्तिमय वातावरणात संपूर्ण परिसर न्हाऊन निघाला.

२०२२ साली केवळ चार भाविकांच्या उपस्थितीत सुरू झालेला हा सप्ताह आज हजारो भाविकांच्या सहभागाने स्वरूपात पार पडला. कीर्तन व प्रवचनादरम्यान अभिमन्यू गिरी महाराजांनी शबरी आणि मातंगऋषी यांच्या आश्रमातील प्रसंग अत्यंत प्रभावी शैलीत मांडला. त्यांनी सांगितले की, शबरी ही करुणामयी व दयाळू स्वभावाची होती. लग्नाच्या वेळी प्राण्यांची हत्या होणार असल्याचे पाहून तिने त्या



हिंसेला विरोध केला आणि घर सोडून मातंग ऋषींच्या आश्रमात आश्रय घेतला.

महाराजांनी सांगितले की, शबरी ही लहानपणापासूनच दयाळू आणि करुणामयी स्वभावाची होती. तिच्या लग्नावेळी प्राण्यांची हत्या होणार असल्याचे पाहून तिने त्या हिंसेचा तीव्र विरोध केला आणि त्या प्रसंगातून पलायन केले. तिच्या या कृतीतून अहिंसा हाच खरा धर्ममार्ग आहे. हा संदेश मानव जातीला मिळतो.

प्रबोधनकार अभिमन्यू गिरी म्हणाले, शबरीने मातंग ऋषी यांच्या आश्रमात आश्रय घेतला आणि पूर्ण समर्पणाने गुरुसेवा केली. आश्रमातील प्रत्येक कार्य ती निष्ठेने पार पाडत असे. विशेष म्हणजे, आपल्या गुरूंच्या वचनावर विश्वास ठेवून तिने आयुष्यभर भगवान रामाच्या आगमनाची प्रतीक्षा केली.

शबरी रोज जंगलातील वाटा स्वच्छ करत असे, कारण तिला खात्री होती की एक दिवस राम त्या मार्गाने येतील. तिच्या या निखळ भक्तीमुळेच रामांनी तिच्या हातचे फळ प्रेमाने स्वीकारले, हा प्रसंग भक्तीचे सर्वोच्च उदाहरण मानला जातो. महाराजांनी आपल्या प्रवचनातून स्पष्ट केले की, शबरीची कथा आपल्याला करुणा, श्रद्धा आणि निस्वार्थ भक्ती यांचे महत्त्व शिकवते. जात, प्रतिष्ठा यापेक्षा अंतःकरणातील शुद्धता आणि प्रेम यालाच खरे स्थान आहे, हा संदेश त्यांनी भाविकांना दिला. हा धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी जय बजरंग बली ग्रुप व भजनी मंडळाचे मोलाचे योगदान लाभले.



तपोवन परिसरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहा भक्तीमय वातावरणात पार पडला. २ एप्रिल रोजी सकाळी काल्याच्या किर्तनाने या सोहळ्याची सांगता झाली.

## तपोवन परिसरात अखंड हरिनाम सप्ताह भक्तीमय वातावरणात पार

# भद्रा मारुती मंदिर परिसरात शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांचे स्वच्छता अभियान

नगर – हनुमान जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील देवस्थान भद्रा मारुती (खुलताबाद) येथे अहिल्यानगरच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वच्छता अभियान राबविले. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हा सामाजिक उपक्रम पार पडला. संस्थेच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात देखील सामाजिक कार्य सुरु आहे.



हनुमान जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील देवस्थान भद्रा मारुती (खुलताबाद) येथे अहिल्यानगरच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वच्छता अभियान राबविले.

हनुमान जयंतीच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात भाविकांची गर्दी होत असल्याने परिसर स्वच्छ व प्रसन्न वातावरण ठेवण्याच्या उद्देशाने या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी स्वयंसेवकांनी मंदिर परिसरातील कचरा संकलित करून स्वच्छतेचा संदेश दिला. या उपक्रमावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे, मुख्याध्यापक भाऊसाहेब कदम, अमोल नलगे उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, भगवान हनुमान हे शक्ती, सेवा आणि समर्पणाचे प्रतीक आहेत. त्यांच्या शिकवणुकीतून आपण समाजसेवेचा मार्ग स्वीकारला पाहिजे. स्वच्छता ही केवळ जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची नैतिक कर्तव्य आहे.

मंदिर परिसरात येणाऱ्या प्रत्येक भाविकाला स्वच्छ, शांत आणि पवित्र वातावरण मिळावे, हीच या अभियानामागील आमची भावना आहे. आज आपण केलेली ही छोटी कृती उद्या मोठ्या बदलाचे रूप घेईल, असा आमचा विश्वास आहे. आपण सर्वांनी स्वच्छतेचा हा संदेश आपल्या गावात, शहरात आणि समाजात पोहोचवावा. 'स्वच्छ भारत, सुंदर भारत' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे त्यांनी आवाहन केले.



# जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने गरजू कुटुंबांना किराणा वाटप

जैन वात्सल्य संस्थेच्या वतीने दर महिन्याला समाजातील गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा, अन्नधान्य वितरण केले जाते. या महिन्यात धार्मिक परीक्षा बोर्ड समोर स्व. अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर किराणा वितरण झाले. किराणा वाटप शारदाबाई अशोक कोठारी व कोठारी परिवाराच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सोनाली राहुल गुंदेचा, सौ. पुनम निखील गुंदेचा, स्नेहल सचिन कोठारी, खुशी, सम्यक कोठारी, राष्ट्रीय जैन कॉन्फरन्सचे राष्ट्रीय मार्गदर्शक अशोक (बाबूशेठ) बोरा, संस्थेचे सेक्रेटरी विजय गुगळे, व्यापारी महासंघाचे ईश्वर बोरा, मूलचंद डागा, सचिन चोपडा आदी उपस्थित होते.



# श्री नृसिंह तपोवन येथे विजय मारुती मंदिरात जन्मोत्सव

सावेडी उपनगरातील तपोवन रोडवरील श्री नृसिंह तपोवन येथील विजय मारुती मंदिरात सकाळी ६.३३ मिनिटांनी श्री हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी भाविक उपस्थित होते. देवस्थानच्या गुरुजींनी रुद्र पठण व वेद मंत्रोचाराचे पठण करून महाआरती झाली. त्यानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. (छाया – विजय मते)

# सावेडी पोस्ट कार्यालयामध्ये स्वच्छता अभियान

## महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण; उपक्रमाचे कौतुक

नगर – शहरातील सावेडी परिसरातील पोस्ट कार्यालयामध्ये स्वच्छता अभियानासोबतच महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनासोबतच महिला सन्मानाचा संदेश दिला गेल्याने कौतुक होत आहे. विशेषतः पोस्टमास्तर किशोर नेमाने यांच्या पुढाकारामुळे हा उपक्रम आदर्श ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.



शहरातील सावेडी परिसरातील पोस्ट कार्यालयामध्ये स्वच्छता अभियानासोबतच महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपणाचा स्तुत्य उपक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी पोस्ट कार्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. आवारातील कचरा साफ करून परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. राज्य शासन 'लाडक्या बहिणी' योजनेच्या माध्यमातून महिलांना सन्मान देत असताना, केंद्र शासनाशी निगडित असलेल्या पोस्ट खात्याच्या सावेडी कार्यालयानेही महिलांना प्राधान्य देत त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून एक नवा पायंडा पाडत आदर्श निर्माण केला आहे.

सावेडी उपनगरातील पोस्ट कार्यालय नुकतेच अद्ययावत करण्यात आले असून, आधुनिक सुविधांमुळे नागरिकांचा पोस्ट सेवांवर विश्वास अधिक दृढ झाला आहे. पैसे भरणे, बचत खाते व्यवहार तसेच विविध आर्थिक सेवांसाठी नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ येथे पाहायला मिळते.

या उपक्रमात पोस्ट मास्तर किशोर नेमाने, पोस्टमन शुभम गायके, प्रदीप हिंगे, तनुजा सोनवणे, अनुष्का वालझाडे, उमेश सोनवणे, राहुल साबळे, भाऊराव शेलार, अजिंक्य खराड, अक्षय अजबे, अशोक लाळगे, बाळासाहेब गाडे, आजिनाथ खेडकर, हरीश गांगुर्डे, रियाज सय्यद, सलीम सय्यद, सचिन जाधव, एमटीएस जावेद शेख, पल्लवी हदगळ तसेच इलियाज शेख यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमात पोस्ट मास्तर किशोर नेमाने यांनी आपल्या भाषणात सांगितले की, स्वच्छता ही केवळ मोहीम नसून ती प्रत्येकाची जबाबदारी आहे. आपण ज्या ठिकाणी काम करतो तो परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. आज महिला कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून आम्ही महिला सन्मानाचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. राज्य शासन महिलांना सन्मान देत असताना, आपणही त्याला प्रतिसाद देत समाजात सकारात्मक बदल घडवणे गरजेचे आहे. वृक्षारोपण ही काळाची गरज असून, लावलेली झाडे जपणे हीदेखील आपली सामूहिक जबाबदारी आहे. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांतून पोस्ट विभाग समाजाशी नाते अधिक दृढ करेल, असे त्यांनी नमूद केले. या उपक्रमातून चार महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आले. स्वच्छता ही दैनंदिन सवय बनवणे, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व त्यांचे संगोपन करणे, महिलांना सन्मान व संधी देणे आणि शासकीय कार्यालयांनी सामाजिक जबाबदारी पार पाडत समाजासमोर आदर्श निर्माण करणे हे त्यामध्ये प्रमुख होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले.



नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आली. शेजारील छायाचित्रात शहरातील महाप्रसाद घेताना भाविक.

# नवीपेठेतील श्रीराम मंदिरात हनुमान जन्मोत्सवचा जल्लोष

## महाप्रसादाने उत्सवाची सांगता


नगर – नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने हनुमान जन्मोत्सव भक्तीभावाने, उत्साहात आणि दिमाखात साजरी करण्यात आली. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची गर्दी उसळली होती. हजारो भाविकांनी प्रभु श्रीराम व हनुमानजींच्या दर्शनाचा लाभ घेतला. हनुमान जन्मोत्सवानिमित्त पहाटे ४ वाजता जलाभिषेक, दुग्धाभिषेक व विशेष पूजनाने कार्यक्रमांची सुरुवात झाली. त्यानंतर प्रभु श्रीराम व हनुमानजींचा आकर्षक शृंगार करण्यात आला. सकाळी ६ वाजता हनुमान जन्म सोहळा व मंगल आरती उत्साहात पार पडली. यावेळी श्री राम जय राम जय जय राम या तारक मंत्राच्या गजराने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

यानंतर सामूहिक हनुमान चालीसा पठण, रामनाम जप, भजन–कीर्तन व सत्संगाचे आयोजन करण्यात आले होते. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील भाविकांनी सहभाग घेतला. दिवसभर अखंड नामस्मरण, हनुमान चालीसा पठण आणि भजनांच्या स्वरांनी वातावरण भक्तिमय झाले होते. मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट व विद्युत रोषणाई करण्यात आल्याने उत्सवाला विशेष रंगत आली होती. दर्शनासाठी शिस्तबद्ध रांगा लावण्यात आल्याने भाविकांना सुरळीत दर्शन घेता आले. ट्रस्ट च्या सेवेकरी नी दिवसभर सेवा देत भाविकांना मार्गदर्शन केले.

हनुमान जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. घराघरांत हनुमान भक्तीचा प्रसार व्हावा या उद्देशाने हनुमान चालीसा पुस्तिकांचे मोफत वितरण करण्यात आले.

स्टेशन रोडवरील बडी साजन मंगल कार्यालय येथे दुपारी १२ ते २ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या महाप्रसादाचा नगर शहरातील तीन–साडेतीन हजार भाविकांनी लाभ घेतला. शिस्तबद्ध पद्धतीने महाप्रसादाचे वितरण करण्यात आले असून ट्रस्ट च्या सेवकरी नी मनापासून सेवा दिली. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था, उपाध्यक्ष निखिल शेटीया तसेच सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व सेवकरीनी अथक परिश्रम घेतले.

# प्रदक्षिणा मार्गाचे महत्त्व



आपल्या सर्वच शास्त्रांमधे प्रदक्षिणेला खूप महत्त्व आहे. आपण मंदिरात जातो, एखादी तरी प्रदक्षिणा आपण त्या मंदिराच्या गाभाऱ्याला, मंदिरात घालतो. आरती झाल्यावर स्वतःभोवती प्रदक्षिणा घालायची पद्धत आपण लहानपणापासून बघतो, करतो आणि अनुभवतो. म्हणूनच विशेष असे महत्त्व प्रदक्षिणेला आहे. या प्रदक्षिणा मार्गामुळे आपल्या शरीराची अणुरेणू संरचना, पेशींची रचना, शरीरस्थित चक्र म्हणजेच सिस्टीम्सवरच्या विकसनावर चांगला परिणाम होतो. एकप्रकारे आपली चंद्रनाडी विकसित पावते. या प्रकाराला एक लय असते. या प्रकाराचा आपल्या मनावर दिर्घकाल परिणाम होतो. हा मानसिकतेवर होणारा परिणाम आपल्या आयुष्यातल्या घटनांशीही निगडित असतो. त्यामुळेच वास्तूशास्त्रात सुद्धा प्रदक्षिणा मार्गाला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे. जेंव्हा एखाद्या वास्तुत प्रदक्षिणा मार्गाने प्रवेश असतो तेव्हा याच बांधकाम शैलीचा विचार त्यामागे असतो. अशा वास्तूवर होणार्या चंद्रनाडीच्या संस्काराचा लाभ हा त्या वास्तूत रहाणार्या व्यक्तींना मिळतो. एक प्रकारे त्या व्यक्तीचे त्या वास्तूशी आणि पर्यायाने त्या परिसराशी तादात्म्य घालून देण्याचे काम प्रदक्षिणा मार्ग करते. त्याचे प्रतिबिंब व्यक्तिगत स्वभाव लक्षणातून, त्याच्या कृतीतून आणि प्रत्यक्ष दिसणार्या वैभवातून अनुभवायला येते. आयुष्याची लय त्याला गवसते.

एखाद्या वास्तूत जेव्हा घड्याळाच्या उलट्या काट्याप्रमाणे प्रवेश असतो म्हणजे अँन्टीक्लॉकवाईज प्रवेश असतो, उलट्या प्रदक्षिणा मार्गाने प्रवेश असतो अशा ठिकाणी ज्या वेळेला अशा वास्तूमध्ये कुठलाही दोष असतो आणि त्या दोषांची जोडणी जेव्हा इतर दोषांबरोबर होते, जे गोचरीवर सुद्धा अवलंबून असते तेव्हा अतिशय संवेदनशील, गंभीर असे दीर्घ मुदतीचे परिणाम आपल्या आयुष्यावर होतात. अशावेळी चक्र बिघडते, मती भरकटते आणि अधोगतीचा रस्ता मोकळा होतो.म्हणूनच वास्तुशास्त्रात प्रदक्षिणा मार्गांनी प्रवेश अतिशय महत्त्वाचा मानला जातो.

**– कौस्तुभ काळे,** वास्तुज्योतिष सल्लागार, अहमदनगर संपर्क ९८५०९४१८८१.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## ‘टेनिस एल्बो’ चा सामना करताना...

टेनिस एल्बो हा आजार प्रामुख्याने हाताच्या कोपराशी संबंधित असून तो केवळ खेळाडूंसाठी मर्यादित नाही. वैद्यकीय भाषेत याला ‘लॅटरल एपिकॉन्डिलायटिस’ असे म्हणतात. कोपराच्या बाहेरील बाजूला असलेल्या अस्थिबंधनांना (टेनडन्स) सूज आल्यामुळे किंवा तिथे सूक्ष्म इजा झाल्यामुळे हा त्रास उद्भवतो. जेव्हा आपण हाताच्या मनगटाची किंवा बाहूची वारंवार हालचाल करतो, तेव्हा कोपराच्या स्नायूंवर अतिरिक्त ताण पडतो. या ताणामुळे हाताची पकड कमकुवत होणे किंवा कोपरापासून मनगटापर्यंत तीव्र वेदना होणे अशी लक्षणे दिसू लागतात. आधुनिक जीवनशैलीमध्ये मोबाईल, संगणकाचा वाढता वापर आणि कामाच्या बदलत्या पद्धतींमुळे या आजाराचे प्रमाणवाढताना दिसत आहे.

या आजाराचे नाव टेनिसशी जोडलेले असले तरी, प्रत्यक्षातील आकडेवारीनुसार दहापैकी नऊपेक्षा जास्त रुग्ण हे टेनिस न खेळणारे असतात. कोपराच्या स्नायूंचा आणि अस्थिबंधनांचा अतिवापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला हा त्रास होऊ शकतो. दैनंदिन जीवनात प्लंबर, सुतार, रंगकाम करणारे कारागीर किंवा अगदी खाटिक काम करणाऱ्या व्यक्तींनाही हा त्रास होण्याची शक्यता अधिक असते. याचे मुख्य कारण म्हणजे या व्यवसायांमध्ये हाताचा आणि मनगटाचा वापर वारंवार एकाच पद्धतीने आणि ताकदीने करावा लागतो. याव्यतिरिक्त संगणकाचा माऊस सतत वापरणे, जड वस्तू वारंवार उचलणे किंवा स्वयंपाकघरात सतत सुरीने कापण्याची कामे करणे यामुळेही कोपराच्या स्नायूंवर ताण येऊ शकतो. साधारणपणे ३० ते ६० वयोगटातील व्यक्तींमध्ये हा त्रास प्रामुख्याने दिसून येतो, कारण या वयात शरीराची झीज भरून काढण्याची क्षमता हळूहळू कमी होऊ लागते.



**मुख्य लक्षणे** :

टेनिस एल्बोची लक्षणे ओळखणे तसे सोपे असते, मात्र अनेकदा लोक त्याकडे साधी कळ म्हणून दुर्लक्ष करतात. कोपराच्या बाहेरील हाडाच्या भागावर स्पर्श केल्यास तीव्र वेदना होणे हे याचे मुख्य लक्षण आहे. सकाळी उठल्यावर हात कडक होणे किंवा वस्तू पकडताना हातात त्राण नसल्यासारखे वाटणे असे अनुभव या त्रासामध्ये येतात. अनेकदा हस्तांदोलन करणे किंवा साधा चहाची कप धरतानाही रुग्णाला त्रास होऊ शकतो. या वेदना रात्रीच्या वेळी जास्त जाणवतात आणि हळूहळू पूर्ण हातामध्ये पसरत जातात.

जर मनगट मागे वळवताना किंवा हाताची बोटे सरळ करताना कोपरात कळा येत असतील, तर ते टेनिस एल्बोचे निश्चित लक्षण मानले जाते.

**प्रमुख कारणे आणि जोखीम:**

टेनिस एल्बो होण्यामागे प्रामुख्याने हाताच्या स्नायूंची पुनरावृत्ती होणारी हालचाल जबाबदार असते. जेव्हा आपण मनगट वर उचलतो किंवा हात सरळ करतो, तेव्हा कोपराच्या बाहेरील बाजूचे स्नायू सक्रिय होतात. या स्नायूंचे टोक ज्या ठिकाणी हाडाला जोडलेले असते, तिथे वारंवार ओढ लागल्यामुळे ‘मायक्रो-टीअर्स’ म्हणजेच सूक्ष्म जखमा तयार होतात. खेळाडूंच्या बाबतीत विचार केला तर टेनिसमध्ये ‘बॅकहँड’ फटका मारताना जर तंत्र चुकीचे असेल, तर कोपरावर प्रचंड ताण येतो. व्यवसायाव्यतिरिक्त धूम्रपान, लठ्ठपणा आणि काही विशिष्ट औषधांचे सेवन यामुळेही अस्थिबंधनांची लवचिकता कमी होऊन हा त्रास उद्भवू शकतो. वाढत्या वयानुसार या उतींची दुरुस्ती होण्याची प्रक्रिया मंदावते, त्यामुळे चाळीशीनंतर अधिक काळजी घेणे गरजेचे असते. या आजारावर उपचार करताना विश्रांतीला सर्वाधिक महत्त्व दिले जाते. ज्या हालचालींमुळे कोपरावर ताण येतो, त्या काही काळ पूर्णपणे थांबवणे किंवा त्यामध्ये बदल करणे आवश्यक असते.

प्राथमिक स्तरावर ‘राईस’ (विश्रांती, बर्फ, कॉम्प्रेशन आणि उन्नती) पद्धतीचा वापर केला जातो. बर्फाचा शेक देणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने दाहशामक औषधे घेणे सूज कमी करण्यासाठी फायदेशीर ठरते. काही प्रकरणांमध्ये हाताला आणि कोपराला स्थिरता देण्यासाठी विशेष ब्रेस किंवा पट्टा वापरण्याचा सल्ला दिला जातो, ज्यामुळे स्नायूंना विश्रांती मिळते. विशिष्ट व्यायामांच्या माध्यमातून कोपराच्या आजूबाजूचे स्नायू बळकट केले जातात, ज्यामुळे अस्थिबंधनांवरील भार कमी होतो.

साध्या उपचारांनी काही आठवड्यांत फरक पडला नाही, तर आधुनिक वैद्यकशास्त्रात इतर प्रगत पर्याय उपलब्ध आहेत. यामध्ये ‘पीआरपी’ (प्लेटलेट रिच प्लाझ्मा) इंजेक्शन्सचा समावेश होतो, ज्यामध्ये रुग्णाच्या स्वतःच्या रक्तातील घटक वापरून नैसर्गिकरीत्या जखम भरून काढली जाते. तसेच शॉकवेव्ह थेरपीच्या माध्यमातून कोपराच्या प्रभावित भागावर ध्वनीलहरी सोडल्या जातात, ज्यामुळे रक्ताभिसरण सुधारते आणि बरे होण्याची प्रक्रिया वेगवान होते. स्टिरॉइड इंजेक्शन्सचा वापर वेदना तात्काळ कमी करण्यासाठी केला जाऊ शकतो, मात्र त्याचा वापर मर्यादित असावा लागतो. अत्यंत दुर्मिळ परिस्थितीत, जेव्हा रुग्ण सहा महिने ते वर्षभर कोणत्याही उपचारांना प्रतिसाद देत नाही आणि दैनंदिन कामे करणे अशक्य होते, तेव्हाच शस्त्रक्रियेचा विचार केला जातो.

**प्रतिबंधात्मक उपाय :**

टेनिस एल्बो टाळण्यासाठी कामाच्या ठिकाणी ‘एर्गोनॉमिक्स’ म्हणजेच शारीरिक रचनेनुसार साधनांचा वापर करणे महत्त्वाचे आहे. संगणकावर काम करताना हात आणि मनगटाची स्थिती योग्य असावी. सतत काम करण्याऐवजी मधूनमधून विश्रांती घ्यावी आणि हाताचे साधे ताणाचे व्यायाम करावेत. खेळाडूंनी प्रशिक्षकांकडून योग्य तंत्र शिकून घ्यावे आणि खेळासाठी वापरली जाणारी साधने (उदा. रॅकेट) वजनाने हलकी आणि योग्य आकाराची असावीत. आहारात प्रथिने आणि पुरेशा पाण्याचे सेवन केल्यास अस्थिबंधनांचे आरोग्य उत्तम राहते. हा आजार पूर्णपणे बरा होणारा आहे, मात्र त्यासाठी वेळीच उपचार आणि सातत्यपूर्ण व्यायाम यांची जोड असणे आवश्यक आहे.

**- डॉ. सम्यक पंचोली,**
**शोल्डर आणि अप्पर लिंब सर्जन,**
**संपर्क ८९८९३२९३२९**

## आयबीएसचा परिणाम आत्मविश्वासावर

शारीरिक आरोग्य आणि मानसिक आरोग्य या पूर्णतः एकमेकांशी पूरक असणाऱ्या बाबी आहेत. शारीरिक आरोग्य सुस्थितीत नसेल तर मनामध्ये उदासीनतेची भावना निर्माण होते, हे अनेकांना माहीत असते; परंतु मानसिक स्थिती व्यवस्थित नसेल तर त्याचा परिणाम शारीरिक आरोग्यावर होतो याची अनेकांना कल्पना नसते. परंतु आधुनिक संशोधनांमधून ही बाब आता पुरेशी स्पष्ट झालेली आहे. इरिटेबल बॉवेल सिंड्रोम (आयबीएस) सारख्या आजारांचे मूळ शोधताना अशा रुग्णांमध्ये अँग्झायटी किंवा चिंतातूरपणा, सततची अस्वस्थता ही कारणे प्रकर्षाने दिसून येतात. पोट फुगणे, पोट साफ न झाल्यासारखे वाटणे, सतत शौचास जावे लागेल या भावनेने बेचैन वाटणे यामुळे रुग्णांच्या झोपेवर, दिनचर्येवर परिणाम होतात. त्यातून शारीरिक आरोग्याशी संबंधित काही समस्या स्वाभाविकपणे निर्माण होतात.

यापलीकडे जाऊन आयबीएसचा सामना करणाऱ्या अनेक रुग्णांमध्ये आत्मविश्वास कमी झाल्याचेही दिसून आले आहे. त्यांच्यामध्ये स्वतःच्या शरीराबद्दलची नकारात्मक धारणा तयार झाल्याचे दिसून येते. या आजाराचे स्वरूप अत्यंत अनपेक्षित असल्याने आणि पचनाच्या तक्रारींबाबत समाजात असलेल्या संकोचामुळे, रुग्णाचा स्वतःवरील विश्वास हळूहळू कमी होऊ लागतो. सार्वजनिक ठिकाणी उद्भवू शकणाऱ्या संभाव्य पेचप्रसंगामुळे रुग्ण सामाजिक कार्यक्रमांपासून दूर राहू लागतो. यातून एकटेपणा आणि न्यूनगंड निर्माण होतो. परिणामी, ‘आयबीएस’चे रुग्ण अनेकदा स्वतःच्या स्थितीला स्वतःलाच जबाबदार धरू लागतात. माझे शरीर सामान्य का नाही? किंवा मी साध्या गोष्टी का हाताळू शकत नाही? अशा प्रश्नांमधून स्वतःबद्दलची कठोर मते तयार होतात. ही स्व-टीका केवळ पोटापुरती मर्यादित न राहता ती रुग्णाच्या कार्यक्षमतेवर आणि कौशल्यांवरही परिणाम करते. कारण पोटाच्या समस्येमुळे कामातील एकाग्रता कमी होते. एखादी जबाबदारी पेलण्यासाठी आवश्यक असणारा स्वतःवरचा विश्वास कमी होतो.



कॅटास्ट्रोफायझिंग आणि सोमॅटायझेशन हे दोन घटक आयबीएसच्या तीव्रतेवर थेट परिणाम करतात. कॅटास्ट्रोफायझिंग म्हणजे वेदनांकडे अत्यंत नकारात्मक दृष्टिकोनातून पाहणे आणि आपण आता हतबल झालो आहोत अशी भावना मनात निर्माण करणे, तर सोमॅटायझेशन म्हणजे मानसिक तणावाचे रूपांतर विविध शारीरिक लक्षणांमध्ये होण्याची प्रवृत्ती होय.

ज्या व्यक्तींचा स्वभाव उपजतच हळवा असतो किंवा ज्यांना सतत नकारात्मक भावनांचा अनुभव येतो, त्यांच्यामध्ये चिंतेचे प्रमाण अधिक असते आणि परिणामी त्यांना आयबीएसचा त्रास अधिक तीव्रतेने जाणवतो. आयुष्यातील जुन्या दुःखद घटना किंवा मानसिक छळ यामुळेही मेंदू आणि पचनसंस्था यांच्यातील समन्वयावर विपरीत परिणाम होतो, ज्यामुळे पोटाचे विकार बळावतात.

या चक्रातून बाहेर पडण्यासाठी आयबीएस रुग्णांवर केवळ पोटावर उपचार करून चालत नाहीत, तर रुग्णाचे मानसिक समुपदेशन करणेही तितकेच गरजेचे असते. समुपदेशनातून त्यांच्यात कमी झालेला आत्मविश्वास पूर्ववत होऊ शकतो. ‘सेन्स ऑफ कोहेरन्स’ म्हणजेच संकटातही आत्मविश्वास टिकवून ठेवण्याचे कौशल्य वाढवता येऊ शकते. परिणामी, रुग्ण या आजाराला अधिक चांगल्या प्रकारे हाताळू शकतात. होमिओपॅथी उपचारपद्धतीमध्ये कौन्सिलिंग आणि औषधोपचार या दोन्ही मार्गांचा अवलंब केला जात असल्यामुळे आयबीएससाठी ती प्रभावी आणि परिणामकारक ठरते. यामध्ये पोटाच्या आजारांची शास्त्रीय कारणे जाणून घेतली जातात आणि रुग्णसंवादातून त्याच्या मानसिक स्थितीचे परिपूर्ण आकलन केले जाते. या दोन्हींच्या आधारावर औषधोपचार केले जातात. होमिओपॅथिक औषधांमुळे रुग्णाचा आत्मविश्वास वाढतो. त्याबरोबरच जीवनशैली पूर्ववत होऊन आयबीएसमुळे निर्माण होणाऱ्या सततच्या अस्वस्थेपासून, चिंताग्रस्ततेपासून ते कायमचे मुक्त होऊन आनंददायी जीवनशैली जगू शकतात.

**- डॉ. तन्मय दर्डा,**
मोबाईल : ९५८८६७८५६६

## मिरचीच्या पाण्याने आंघोळ?

चीनमधील पारंपरिक गरम पाण्याच्या झऱ्याला आता एक अनोखे वळण मिळाले आहे. पारंपरिक चिनी औषध प्रणालीने प्रेरित झालेले ‘हॉटपॉट बाथ’ लोकांना गरम सूपसारख्या पाण्यात स्नान करण्याची संधी देत आहेत. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टच्या वृत्तानुसार, या बाथ हाऊसमध्ये दूध, मिरची, गोजी बेरी आणि लाल खजूर यांसारखे आरोग्यवर्धक मानले जाणारे पदार्थ टाकले जातात.

डिसेंबर महिन्यात हेईलोंगजियांग प्रांतातील हरबिन शहरातील एका रिसॉर्टने या ट्रेंडचे सर्वात आकर्षक रूप सादर केले. तिथे पाच मीटर रुंदीचा गोलाकार गरम पाण्याचा झरा लाल आणि पांढरा अशा दोन भागांमध्ये विभागलेला आहे. लाल भाग हा तिखट सूपसारखा दिसतो, ज्यामध्ये मिरची, कोबी आणि वांगी टाकली आहेत. स्टाफनुसार, हा लाल रंग गुलाबाच्या पाकळ्यांमधून येतो, ज्या दररोज बदलल्या जातात.



पांढरा भाग हा दूध, लाल खजूर आणि गोजी बेरीने बनलेला सौम्य सूप दर्शवतो. स्टाफच्या म्हणण्यानुसार, गरम पाण्यात टाकलेल्या हलक्या मिरच्या चयापचय वाढवतात आणि रक्तप्रवाह सुधारतात, तर दूध त्वचेला आर्द्रता प्रदान करते. म्हणजे, हा अनुभव चव, सुगंध आणि आरोग्य या तिन्हींचे मिश्रण आहे. रिपोर्टनुसार, या आकर्षणाचे प्रवेश तिकीट सुमारे १६० युआन (जवळपास १,९०० रुपये) आहे. यात हॉटपॉट बाथ, सॉना आणि बुफे जेवणाचा समावेश आहे.

येथे वय किंवा वेळेची कोणतीही कठोर मर्यादा नाही; परंतु १५-२० मिनिटांपर्यंत आंघोळ करण्याचा सल्ला दिला जातो. हे बाथ पारंपरिक औषधी वनस्पती आणि आधुनिक वेलनेसच्या अनोख्या संगमाचे प्रतीक आहेत. शतकानुशतके जुन्या औषधी स्नानामुळे प्रेरित झालेला हा ट्रेंड आता एक दृश्य आणि सांस्कृतिक अनुभव बनला आहे. आरोग्यासाठी असो वा सेल्फीसाठी, चीनमधील हे सूप बाथ सोशल मीडियावर सगळ्यांना आकर्षित करत आहे.

## तोंडात डोळे असणारा बेडूक

कधी कधी निसर्ग अशा काही गोष्टी घडवतो ज्यावर विश्वास ठेवणं अशक्य वाटतं. असंच काहीसे कॅनडामध्ये घडले. येथे एका मुलीला असा बेडूक दिसला ज्याचे डोळे बाह्यबाजूला डोक्यावर नाही तर त्याच्या तोंडात होते. पहिल्यांदा हा प्रकार विचित्र वाटेल, मात्र ही अफवा नाही तर वैज्ञानिकदृष्ट्या सत्य आहे.

कॅनडाच्या ओंटारिया भागात बर्लिंगटनमध्ये राहणारी एका शालेय विद्यार्थिनी डिड्रे आपल्या अंगणात खेळत होती. तेव्हा एक विचित्र बेडूक दिसला. तो डोळे बंद करून बसलेला होता. त्याने तोंड उघडताच डिड्रे जोरात ओरडली. त्याच्या तोंडात दोन चमकणारे डोळे दिसत होते. डिड्रेला वाटतं त्याने दुसरा एखादा जीव गिळला असेल; मात्र लक्ष देऊन पाहिलं तर ते डोळे बेडकाचे स्वत:चेच होते. डिड्रेने या बेडकाचं नाव लॉर्ड ऑफ द रिंग्सच्या पात्रावरून गोलमचं नाव दिलं. गोलम अंधारात राहत होता. तिने या बेडकाचे फोटो काढले आणि स्थानिक वृत्तपत्र कराळश्रींप डशिर्लीरी ला पाठवले.



वृत्तपत्राचा फोटोग्राफर स्कॉट गार्डनरला आधी ही मस्करी वाटली; मात्र त्याने नीट पाहिलं तेव्हा तोही हैराण झाला. यानंतर हा बेडूक देशभरात प्रसिद्ध झाला. शास्त्रज्ञांच्या मते, हे एक आनुवंशिक म्युटेशन आहे. म्हणजेच गर्भाच्या विकासादरम्यान होणारा अडथळा. सामान्यतः बेडकाचे डोळे डोक्याच्या वरच्या बाजूला विकसित होतात; परंतु या प्रकरणात जनुकाची दिशा उलट झाली. टोरंटो विद्यापीठाचे प्राध्यापक जेम्स बोगर्ट यांच्या मते, ‘गोलम’चे डोळे मागे सरकले आणि तोंडाच्या आत विकसित झाले. हे मॅक्रोम्युटेशनचे प्रकरण आहे, जे खूप दुर्मीळ आहे. रासायनिक प्रदूषण किंवा पर्यावरणीय परिणामांची भूमिका यात महत्त्वाची असण्याची शक्यता आहे.

## साठ लाख वर्षांपूर्वीचा बर्फाचा तुकडा

अंटार्क्टिका खंडातून शास्त्रज्ञांनी ६० लाख वर्षांपूर्वीचा बर्फाचा एक तुकडा बाहेर काढला आहे. हा बर्फ थेट कालमापन केलेला आतापर्यंतचा सर्वात जुना बर्फ आहे. या शोधातून शास्त्रज्ञांना पृथ्वीच्या प्राचीन हवामानाची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

नुकत्याच ‘पीएनएएस’या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका नवीन अभ्यासानुसार, हा विक्रम मोडणारा बर्फ आणि त्यात अडकलेले हवेचे बुडबुडे, सुमारे २७ लाख वर्षे जुन्या असलेल्या पूर्वीच्या सर्वात जुन्या ज्ञात बर्फाच्या नमुन्यांपेक्षा दुप्पट वयाचे आहेत. बर्फाचे गाभे हे टाईम मशिनसारखे आहेत, जे शास्त्रज्ञांना आपला ग्रह भूतकाळात कसा होता, हे पाहण्याची संधी देतात, असे या अभ्यासाच्या प्रमुख लेखिका आणि मॅसॅच्युसेट्समधील वुड्स होल ओशनोग्राफिक इन्स्टिट्यूशनमधील सहायक शास्त्रज्ञ सारा शॅकलटन यांनी एका निवेदनात सांगितले.



‘ॲलन हिल्सचे गाभे आपल्याला शक्य आहे त्यापेक्षा खूप पूर्वीच्या काळात घेऊन जातात.’ हा बर्फ आणि हवा मायोसिन युगातील (२३० लाख ते ५३ लाख वर्षांपूर्वी) आहेत. त्यावेळी पृथ्वी खूप उष्ण होती, समुद्राची पातळी उंच होती आणि ग्रहावर आता विलुप्त झालेले प्राणी जसे की, सॅबर-टूथ्ड मांजरी, ओकापीसारखे जिराफ, आर्क्टिक गेंडे आणि पहिले मॅमथ होते. शॅकलटन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी २०१९ ते २०२३ दरम्यान पूर्व अंटार्क्टिकाच्या दुर्गम ॲलन हिल्स ब्लू आइस एरियामध्ये हा विक्रम मोडणारा बर्फ शोधला.

अभ्यासानुसार, ॲलन हिल्स बर्फाचे मैदान समुद्रसपाटीपासून सुमारे ६,५०० फूट (२,००० मीटर) उंचीवर आहे. नमुने मिळवण्यासाठी संशोधकांनी बर्फाच्या थरामध्ये ३३० ते ६६० फूट (१०० ते २०० मीटर) खाली ड्रिलिंग केले. त्यानंतर त्यांनी हवेच्या कणांमध्ये असलेल्या अर्गॉन समस्थानिकांच्या किरणोत्सर्गी ऱ्हासाचे मापन करून उत्खनन केलेल्या बर्फाच्या गाभ्यांचे कालमापन केले. या गाभ्यांमधील ऑक्सिजन आयसोटोप्सचा मागोवा घेऊन शास्त्रज्ञांनी हे देखील निश्चित केले की, गेल्या ६० लाख वर्षांमध्ये ॲलन हिल्स प्रदेशात सुमारे २२ अंश फॅरेनहाईट (१२ अंश सेल्सिअस) पर्यंत सतत थंडावा आला आहे.

जरी अंटार्क्टिका आणि संपूर्ण पृथ्वी गेल्या काही हजार वर्षांपासून हळूहळू थंड होत असली, तरी मनुष्य मोठ्या प्रमाणात उष्णता शोषून घेणारे हरितगृह वायू वातावरणात सोडून जागतिक तापमान झपाट्याने वाढवत आहेत. नवीन अभ्यासाच्या लेखकांनी सांगितले की, या बर्फाच्या गाभ्यांचे विश्लेषण करून, ते हरितगृह वायू आणि समुद्रातील उष्णतेची प्राचीन पातळी समजू शकतात. यामुळे त्यांना पृथ्वीच्या इतिहासातील हवामान बदलाच्या नैसर्गिक कारणांना अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येईल.



## २० टन अन्नसेवनाची क्षमता!

समुद्राच्या खोलवर राहणारे महाकाय व्हेल मासे त्यांच्या प्रचंड आकारामुळे आणि खाण्याच्या सवयींमुळे ओळखले जातात. पण, तुम्ही कधी विचार केला आहे का की, एक व्हेल एका दिवसात किती अन्न खाऊ शकते? शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की व्हेल दररोज जेवढे अन्न खातात, त्याची मात्रा इतर कोणत्याही जीवापेक्षा खूप जास्त असते. संशोधनानुसार, एक प्रौढ व्हेल दररोज १ ते ४ टन (टन म्हणजे १००० किलो) पर्यंत अन्न खाऊ शकते. ही मात्रा तिची प्रजाती, आकार, वय आणि हवामानानुसार बदलत राहते.

व्हेलची सर्वात मोठी प्रजाती म्हणजे ब्ल्यू व्हेल (निळा देवमासा), जी पृथ्वीवरील सर्वात मोठी सजीव प्रजाती मानली जाते. हा व्हेल दररोज सुमारे ३ ते ४ टन क्रिल म्हणजेच लहान कोळंबी माशांसारखे जीव खातो. एका अंदाजानुसार, ही मात्रा सुमारे चार कोटी क्रिल एवढी असते. काही संशोधकांचा असा विश्वास आहे की पूर्व उत्तर पॅसिफिक महासागरात एक ब्ल्यू व्हेल एका दिवसात १० ते २० टन पर्यंत अन्न खाऊ शकतो. स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या संशोधकांच्या मते, या अन्नाची मात्रा सुमारे २० ते ५० दशलक्ष कॅलरी इतकी असते. ब्ल्यू व्हेलच्या जेवण करण्याची पद्धत खूप मनोरंजक आहे : ती आपले प्रचंड तोंड उघडून पाण्याचा एक मोठा भाग गिळते.

त्यानंतर, बलीन प्लेटसब नावाच्या संरचनेच्या मदतीने ती पाणी बाहेर काढते आणि फक्त क्रिल आत ठेवते. हंपबॅक व्हेल आणि फिन व्हेल यांसारख्या इतर व्हेल प्रजाती प्रामुख्याने लहान मासे, क्रिल आणि प्लवक खातात. तर ओर्का किंवा किलर व्हेल यांसारख्या प्रजाती शिकारी स्वभावाच्या असतात आणि त्या मासे, सील आणि इतर समुद्री सस्तन प्राण्यांची शिकार करतात. संशोधकांचे असे मत आहे की, ब्ल्यू, फिन, मिंक आणि हंपबॅक व्हेल यांसारख्या बलीन व्हेल पूर्वीच्या अंदाजांपेक्षा सरासरी दरवर्षी सुमारे तिप्पट जास्त अन्न खातात.

## हायड्रोफॉयल तंत्रज्ञानाच्या अंतरंगात..

बोटींचा वेग वाढवण्याच्या इच्छेतून जन्मलेले हायड्रोफॉयल तंत्रज्ञान आज जलवाहतुकीला अधिक स्वच्छ रूप देण्यासाठी पुनरुज्जीवित होत आहे. हे तंत्रज्ञान बोटींना लाटांवरून वर उचलण्यास मदत करते.

१८६० च्या दशकात फ्रान्समध्ये एक विचित्र दृश्य दिसले असेल, एक वल्हवणारी बोट पाण्यावर उंच तरंगताना दिसत होती, ज्यामध्ये खाली लावलेले काही आकारांचे भाग तिला वर उचलण्यास मदत करत होते. १८६९ मध्ये पॅरिसचे शोधक इमॅन्युएल डेनिस फारकॉट यांनी या प्रकारच्या जहाजाचे पहिले पेटंट दाखल केले होते. ही हायड्रोफॉयल बोट प्रत्यक्षात बांधली गेली की नाही हे माहीत नाही; पण पुढील ५० वर्षांत इतरांनी बोटीला पाण्यावर ‘उडवण्यात’ यश मिळवले, हे निश्चित आहे. इटालियन शोधक एनिको फोरलानिनी यांनी १९०६ मध्ये इटालियन आल्प्समधील लेक मॅगिओरवर एक कार्यरत हायड्रोफॉयल बोट यशस्वीरीत्या तरंगवली.



टेलिफोनचे शोधक स्कॉटिश अलेक्झांडर ग्रॅहम बेल यांनीही सुरुवातीचे विमान डिझाईन करण्याच्या प्रयत्नात अनेक हायड्रोफॉयल तंत्रज्ञान विकसित केले. बेलच्या चौथ्या हायड्रोफॉयल जहाजाने, ज्याला HD-4 म्हणून ओळखले जाते, ७० मैल प्रति तास (११३ किमी/तास) पेक्षा अधिक वेग गाठला. याने जलवाहनांसाठी जागतिक वेगाचा विक्रम मोडला आणि तो विक्रम त्यांनी एक दशक टिकवून ठेवला. स्वीडनच्या घढक रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमधील नेव्हल आर्किटेक्चरचे प्राध्यापक जैकब कुटेनकेउलर म्हणतात, ‘१९०० च्या दशकाच्या सुरुवातीला, लोक हायड्रोफॉयलसह प्रयोग करत होते आणि त्यामुळे जहाजांना जास्त वेग, कमी ड्रॅग (पाण्याचा कमी अडथळा) यांसारखी मनोरंजक वैशिष्ट्ये मिळाली.’ १९६० च्या दशकात हायड्रोफॉयलमध्ये स्वारस्य वाढले.

कारण, लोकांना जास्त वेगाने प्रवास करायचा होता. आता, हायड्रोफॉयलचा पुन्हा उदय होत आहे. यावेळी, फेरी सारख्या लहान बोटींमधून होणारे उत्सर्जन कमी करण्याच्या क्षमतेमुळे. कुटेनकेउलर म्हणतात, ‘आज हायड्रोफॉयलकडे वळण्याचे मुख्य कारण म्हणजे इलेक्ट्रिफिकेशन.’ सुरुवातीचे हायड्रोफॉयल जीवाश्म इंधनावर चालत होते आणि त्यांचे शरीर जड धातूचे होते. त्यांच्या व्ही-आकाराच्या फॉइलमुळे ते पारंपरिक बोटींपेक्षा खूप वेगाने जात होते; पण तरीही बराच ‘ड्रॅग’ (पाण्याचा विरोध) निर्माण होत होता. २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत, उपलब्ध साहित्य, ऊर्जा स्रोत आणि तंत्रज्ञान यामुळे हायड्रोफॉयल तंत्रज्ञान ठप्प झाले होते; पण कुटेनकेउलर यांच्या मते, नवीन तांत्रिक प्रगतीमुळे हायड्रोफॉयलने आधुनिक पुनरागमन केले आहे. यात लहान, अधिक कार्यक्षम बॅटरी, हलके बांधकाम साहित्य आणि मायक्रो कॉम्प्युटर यांचा समावेश आहे. हे मायक्रो कॉम्प्युटर सेन्सर्स चालवतात, जे हायड्रोफॉयलला आपोआप संतुलित करतात. यामुळे जुन्या व्ही-आकाराच्या फॉइलऐवजी आता सुव्यवस्थित सिंगल फॉइल वापरले जातात, जे बोटीला पूर्णपणे हवेत उचलतात.

# दिव्यांग विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांची बदली रद्द करा

### सावली दिव्यांग संघटनेचे जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे मागणी



तुकाराम मुंढे यांची बदली रद्द करण्याबाबत सावली दिव्यांग संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन देण्यात आले.

नगर – दिव्यांग सक्षमीकरण विभागाचा कार्यभार तुकाराम मुंढे यांचेकडे आले नंतर अल्पावधीतच मुंढे यांनी दिव्यांग व्यक्तींच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. त्यात प्रामुख्याने बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करुन सरकारी नोकरी, पदोन्नती यासारखे दिव्यांगाचे आरक्षण घेतलेल्या बोगस दिव्यांगाविरोधात शासन निर्णय करुन सर्व प्रशासकिय विभागातील दिव्यांग कर्मचाऱ्यांची सक्तीने पडताळणी करणे बंधनकारक करण्यात आले त्यामुळे आजपर्यंत राज्यभरात जवळपास चारशेपेक्षा अधिक बोगस दिव्यांग कर्मचारी आढळुन आले त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्यात आली व ही पडताळणी प्रक्रीया सुरु आहे. मुढेंच्या बदलीमुळे या प्रक्रीयेला खिळ बसण्याची शक्यता निर्माण होवुन शकते. तुकाराम मुंढे राज्यातील दिव्यांग बांधवासाठी खऱ्या अर्थाने 'डॅशिंग अधिकारी आणि न्याय देणारे आधारस्तभ ठरत होते. अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याची तडकाफडकी बदली करणे हे प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांच्या मनोबलावर आधात करणारे आहे

राज्यातील लाखो दिव्यांग व्यक्तींचे हित आणि पारदर्शक प्रशासन टिकवुन ठेवण्यासाठी तुकाराम मुंढे यांची झालेली बदली तात्काळ रदद करावी आणि त्यांना दिव्यांग कल्याण विभागातच कार्य करण्याची संधी दयावी अशा आशयाचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांचे मार्फत पाठवण्यात आले

यावेळी सावली दिव्यांग संघटनेचे बाबासाहेब महापुरे, चांद शेख, बाहुबली वायकर, संभाजी गुठे, संदिप चेडे, समाधान कदम, बाबासाहेब गडाख, मल्हारी शेवाळे, महादेव काटे, ताराचंद पिवळ, अनिल विघ्ने, गणेश महाजन, सखुबाई मिसाळ, अनिता पवार, निलोफर शेख आदी उपस्थित होते.

# आलमगीर परिसरात जुन्या वादातून कुऱ्हाडीने हल्ला

नगर – भिंगार शहरानजीकच्या आलमगीर परिसरातील ब्रम्हनगर येथे जुन्या वादाच्या कारणावरून एका व्यक्तीवर कुऱ्हाडीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अशोक बन्सी गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे आपल्या कुटुंबासह देवकृपा कॉलनी परिसरात राहतात. १ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास आरोपी राजू कुऱ्हाडे आणि मयूर राजू कुऱ्हाडे हे संगनमत करून गायकवाड यांच्या घरासमोर आले. तुमच्यामुळे माझ्या मुलीला त्रास होतो, असा आरोप करत आरोपींनी वाद उकरून काढला. वादाचे रूपांतर शिवीगाळ आणि मारहाणीत झाले. यावेळी आरोपीने हातातील कुऱ्हाडीच्या मागील बाजूने (तुंब्याने) अशोक गायकवाड यांच्या पाठीवर जोरात प्रहार करून त्यांना जखमी केले.

पतीला वाचवण्यासाठी त्यांची पत्नी मध्ये आली असता, आरोपींनी त्यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी परिसरात मोठा गोंधळ निर्माण झाला होता. आरोपींनी जाताना फिर्यादीला जीवे मारण्याची धमकीही दिली. जखमी गायकवाड यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी दोघांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार डी. पी. मोरे करत आहेत.



शहरातील न्यू टिळक रोड, वाडिया पार्क परिसरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या चौकात A मार्ट चे उद्घाटन झाले.

# न्यू टिळक रोडवर A मार्ट चे उद्घाटन

नगर – शहरातील न्यू टिळक रोड, वाडिया पार्क परिसरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या आयुर्वेद कॉलेज चौकात, A मार्ट चे उद्घाटन उत्साहात झाले. या नवीन मार्केटमुळे नगरकरांना आता घरगुती उपयोगी वस्तूंसह फॅशनच्या सर्व गोष्टी एकाच छताखाली मिळणार असून, उद्घाटनानिमित्त आयोजित 'भव्य सेल' हे मुख्य आकर्षण ठरणार आहे.

### सर्व काही एकाच छताखाली!

A मार्ट मध्ये ग्राहकांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा मोठा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने फॅशन आणि फूटवेअर, महिला, पुरुष आणि लहान मुलांसाठी स्टायलिश चप्पल, सँडल, टी-शर्ट, नाईट पॅन्ट, ओढणी आणि होजिअरी कपड्यांचे नवनवीन कलेक्शन.

सौंदर्य आणि स्टाईल : दर्जेदार कॉस्मेटिक्स आणि विविध प्रकारचे ट्रेंडी चष्मे (गॉगल्स).

बालगोपाळांसाठी खास : लहान मुलांची आकर्षक खेळणी आणि त्यांच्यासाठी खास नाईट पॅन्ट-टी-शर्टचे दालन.

घरगुती वस्तू : किचनसाठी उपयुक्त चाकू, खोरे, स्टँडस् आणि आकर्षक पाण्याच्या बॉटल्स यांसारख्या उपयोगी वस्तूंची रेलचेल येथे पाहायला मिळणार आहे.

नगरमधील मध्यवर्ती भागात ग्राहकांना रास्त दरात दर्जेदार वस्तू मिळाव्यात, या उद्देशाने A मार्ट सुरू करण्यात आले आहे. आमच्याकडील प्रत्येक वस्तू ही गुणवत्ता आणि किंमत या दोन्ही बाबतीत ग्राहकांना नक्कीच आवडेल, असा विश्वास मार्केटच्या संचालकांनी व्यक्त केला आहे.

### उद्घाटन सेलचा लाभ घेण्याचे आवाहन

उद्घाटनानिमित्त मार्केटमध्ये विशेष सवलत योजना सुरू करण्यात आली आहे. मर्यादित कालावधीसाठी असलेल्या या सेलचा लाभ घेण्यासाठी वाडिया पार्क, न्यू टिळक रोड आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन व्यवस्थापनातर्फे करण्यात आले आहे. दर्जेदार खरेदी आणि भरघोस बचतीसाठी A मार्ट हे आता नगरकरांचे पसंतीचे ठिकाण ठरणार आहे. स्थळ : आयुर्वेद कॉलेज चौक, वाडिया पार्क जवळ, न्यू टिळक रोड, अहिल्यानगर. वेळ: सकाळी ९:३० ते रात्री १०:०० पर्यंत.

# नवकार महामंत्र दिन जनजागृतीसाठी 'जितो'च्यावतीने ५ एप्रिल रोजी नवकार सायकल रॅली २०२६ चे आयोजन

नगर – 'नवकार महामंत्र' हा जगाच्या कल्याणासाठीचा मंत्र आहे. नित्यनेमाने नवकार जाप केल्यास अलौकिक ऊर्जा प्राप्त होते. भौतिक जगात अध्यात्मिक शांतता मिळते. याची प्रचीती जगभरात येत असल्याने ९ एप्रिल रोजी जागतिक स्तरावर 'नवकार महामंत्र' दिवस साजरा होत आहे. यादिवशी अहिल्यानगर येथे आचार्यांश्रींच्या पावन भूमीतही नकार महामंत्र दिन साजरा होणार आहे. नवकार दिन जनजागृतीसाठी जितो अहिल्यानगर युथ विंगच्यावतीने ५ एप्रिल रोजी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व समाजातील १२ वर्षांपुढील मुले मुली, महिला पुरुष यात सहभागी होऊन होवून विश्वशांती, इंधन बचत, उर्जा बचत, आरोग्याचा संदेश देणार आहेत, अशी माहिती जितो अहिल्यानगर युथ विंगचे चेअरमन चेतन भंडारी व सेक्रेटरी यश भंडारी यांनी दिली.

रविवारी सकाळी ७.३० वाजता आनंदधाम येथून सायकल रॅलीला सुरुवात होईल. आनंदधाम-मार्केट यार्ड-बंगाल चौकी- खिस्त गल्ली- कापड बाजार- दाळ मंडई - रामचंद्र खुंट- कोठी रोड ते आनंदधाम या रॅलीचा मार्ग असणार आहे. केशर गुलाब मंगल कार्यालय येथे रॅलीचा समारोप होईल. याठिकाणी सर्वांसाठी पौष्टिक नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे. रॅलीत सहभागी होणाऱ्या सर्वांना मेडल देण्यात येणार आहे.

नवकार मंत्र हा जगासाठी तारक मंत्र आहे. आताच्या जागतिक अशांततेच्या काळात तर अहिंसा व शांततेचे महत्व अधिक प्रकर्षाने जाणवत आहे. जगाला तारण्याची व शांतता प्रस्थापित करण्याची ताकद नवकार महामंत्रात आहे. नवकार जाप प्रत्येकाच्या मनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारा असतो. त्यामुळेच जागतिक स्तरावर नवकार महामंत्र दिवस साजरा केला जातो. या दिव्य आयोजनाचा उद्देश नवकार महामंत्राच्या अद्भुत शक्तीचा प्रचार व प्रसार करणे आणि अधिकाधिक लोकांना या आध्यात्मिक साधनेसाठी प्रेरित करणे हा आहे. अहिल्यानगर शहरात आयोजित नवकार सायकल रॅलीत नगरकरांनी सहभागी होण्याचे आवाहन जितो अहिल्यानगरचे चेअरमन आलोक मुनोत व सेक्रेटरी तुषार कर्नावट यांनी केले आहे.



श्री हनुमान जयंती निमित्त जुना दाणे डबरा येथील श्री हनुमान मंदिर येथे भंडारा निमित्त महाआरती करताना व्यापारी तसेच भाविक महाआरतीनंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. (छाया – धनेश कटारिया)

# लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत केडगावच्या सरस्वती विद्यालयाचे यश

### देवांश जाधव, आराध्या जाधव व श्रेया मरकड राज्याच्या गुणवत्ता यादीत चमकले



नगर – केडगाव येथील सरस्वती प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विविध इयत्तांमधील विद्यार्थ्यांनी राज्य आणि जिल्हा पातळीवर उज्वल कामगिरी करत शाळेचे नाव उंचावले आहे.

इयत्ता पहिलीतील देवांश महेश जाधव याने राज्यात सहावा क्रमांक पटकावला. इयत्ता दुसरीतील आराध्या सोमनाथ जाधव हिने राज्यात तिसरा क्रमांक मिळवला. त्याच इयत्तेतील श्रेया संजय मरकड हिने राज्यात अकरावा व जिल्ह्यात चौथा क्रमांक मिळवला, तर कु. अंजली नवनाथ मळेकर हिने राज्यात पंधरावा व जिल्ह्यात आठवा क्रमांक पटकावला. इयत्ता तिसरीतील कु. लावण्या राजू बोरगे हिने राज्यात एकोणिसावा व जिल्ह्यात बारावा क्रमांक मिळवला. कु. स्वरा समीर कुलकर्णी हिने चौतीसावा व जिल्ह्यात चोवीसावा क्रमांक मिळवला.

इयत्ता चौथीतील कार्तिक अतुल सोनवणे याने राज्यात तिसावा व जिल्ह्यात तेवीसावा क्रमांक मिळवला, तर चि. श्लोक संजय मरकड याने राज्यात पंचेचाळीसावा व जिल्ह्यात अडोतीसावा क्रमांक मिळवला. इयत्ता पाचवीतील चि. आयुष बाबासाहेब पडळकर याने राज्यात तेहतीसावा व जिल्ह्यात सहवीसावा क्रमांक मिळवत गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक संदिप भोर, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद तसेच पालकांनी कौतुक केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# केडगाव परिसरातील टायर दुकानातून चोरी

### काउंटरचे ड्रॉवर तोडून ५० हजारांची रोकड चोरट्यांनी पळविली

नगर – नगर-पुणे रस्त्यावर केडगाव परिसरात असलेले 'बालाजी टायर्स' हे दुकान अज्ञात चोरट्यांनी छताचे पत्रे उचकटून फोडल्याची घटना २ एप्रिल रोजी सकाळी उघडकीस आली. चोरट्यांनी दुकानाच्या काउंटरमधील ५० हजार रुपयांची रोकड चोरून नेली असून, याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सचिन दादाभाऊ कोतकर (वय ४०, रा. गणेश अपार्टमेंट, एकनाथनगर, केडगाव) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. कोतकर यांचे रंगोली चौकात टायर्स विक्रीचे दुकान आहे. १ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता त्यांनी नेहमीप्रमाणे दुकान बंद केले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजेच्या सुमारास जेव्हा त्यांनी दुकान उघडले, तेव्हा हा चोरीचा प्रकार उघडकीस आला.

चोरट्यांनी दुकानाच्या छताचे पत्रे कशाच्या तरी साहाय्याने उचकटून आत प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील काउंटरचे ड्रॉवर तोडून त्यामध्ये ठेवलेली ५० हजार रुपयांची रोकड (१०० रुपयांच्या ५०० नोटा) लंपास केली. दुकानातील इतर सामानही अस्ताव्यस्त पडलेले होते. या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. कोतकर यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (अ), ३३१ (३), ३३१ (४) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# मनसेकडून सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी सदस्य नोंदणी महत्त्वाची : शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांचे प्रतिपादन



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात करण्यात आली असून या अभियानाचा शुभारंभ दिल्ली गेट येथे करण्यात आला.

नगर – हनुमान जयंतीच्या पावन दिवशी शहरात मनसे सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात करण्यात आली असून या उपक्रमाला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे, असे प्रतिपादन शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांनी केले. शहरातील विविध भागांमध्ये कार्यकर्त्यांमार्फत सदस्य नोंदणी सुरू करण्यात येणार असून दिलीगेट येथे याचा शुभारंभ करण्यात आला.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सदस्य नोंदणी अभियानाला सुरुवात करण्यात आली असून या अभियानाचा शुभारंभ दिल्लीगेट येथे करण्यात आला. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, शहर उपाध्यक्ष संदीप चौधरी, दीपक दांगट, विभाग अध्यक्ष प्रशांत जाधव, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश जाधव, मनोज राऊत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


पुढे बोलताना राशिनकर म्हणाले की, अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विचारांना व्यापक स्तरावर पोहोचविणे ही काळाची गरज आहे. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर लढा देण्यासाठी मजबूत संघटना उभी राहणे आवश्यक असून सदस्य नोंदणी अभियान हा त्यासाठीचा महत्त्वाचा टप्पा आहे. आगामी काळात अधिक जोमाने काम करून पक्षाची ताकद वाढविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

शहरातील विविध भागांमध्ये या सदस्य नोंदणी अभियानाचा प्रारंभ करण्यात येत असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मनसेच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पक्षाचे विचार पोहोचवण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

जिल्हाध्यक्ष सचिन डफळ यांनी सांगितले की, संघटन बळकट करण्यासाठी सदस्य नोंदणी अभियान अत्यंत महत्त्वाचे असून या माध्यमातून नव्या कार्यकर्त्यांना संधी मिळणार आहे. पक्षाच्या धोरणांवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक शहर सचिव डॉ. संतोष साळवे यांनी केले. विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश जाधव यांनी आभार मानले.

# बाल हनुमान हर्षद आनेचा यांनी नगरकरांना केले मंत्रमुग्ध



नगर – बाल हनुमान म्हणून चि. हर्षद योगेश आनेचा हे नगर शहराला परीचीत आहे. वयाच्या सहाव्या वर्षापासून बाल कलाकार हर्षद आनेचा हे हनुमानाची आकर्षक अशी वेशभूषा करून श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट)श्रीराम मंदिर नवीपेठ येथील हनुमान चालीसा मंडळामध्ये बाल हनुमान म्हणून सेवा देत आहेत. रामजी की निकली सवारी, सुनते ही राम नाम नाचे हनुमान, दुनिया चले न श्रीराम के बिना, अंजनीच्या सुता तुला रामाचं वरदान अशा अनेक भजनांवर नृत्याची सेवा देतात. हनुमान चालिसा वर नृत्य हे सर्वांच्या आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले. या संगीतमय भजनांवर नृत्य करून बाल हनुमान हर्षद आनेचा यांनी सर्व नगरकरांना मंत्रमुग्ध केले आहे. दरवर्षी अहिल्यानगर येथे ३१ दिवस होणाऱ्या सामुहिक हनुमान चालीसा पठण कार्यक्रमात बाल हनुमान हर्षद योगेश आनेचा उपस्थित असतात.

हर्षद आनेचा यांना मंडळाचे अध्यक्ष प्रितम मुथा, उपाध्यक्ष निखिल शेटीया, मंडळाचे ज्येष्ठ सदस्य अशोक खंडेलवाल, वडील योगेश आनेचा व आई सौ. नंदा आनेचा यांच्याकडून प्रेरणा मिळाली आहे. त्यामुळे बाल हनुमान हर्षद आनेचा यांच्यावर बाल वयापासूनच धार्मिक संस्कार झालेले आहेत. अहिल्यानगर शहरामध्ये बाल हनुमान हर्षद योगेश आनेचा आणि श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट यांचा डंका वाजत आहे.



सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौक परिसरात 'मी राजहंस' लर्निंग डेव्हलपमेंट अॅण्ड मल्टी थेरपी सेंटरच्या वतीने जागतिक ऑटिझम (स्वमग्नता) जागरूकता दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# मोबाईल नंबर मागितल्यावरून तरुणाला मारहाण; गांधी मैदानातील घटना, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – शहरातील गांधी मैदान चौक परिसरात मोबाईल नंबर मागितल्याच्या कारणावरून एका तरुणाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत तनवीर गुलाम हुसेन शेख (वय ३८, रा. आनंदीबाजार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे गांधी मैदान परिसरातून पायी जात होते. यावेळी त्यांनी तेथे असलेल्या ऋषीकेश नावाच्या तरुणाकडे त्याच्या मालकाचा मोबाईल नंबर मागितला. मला तुझ्या मालकाचे काम आहे, त्यांचा नंबर दे, असे तनवीर यांनी विचारले. याचा राग आल्याने ऋषीकेश याने तनवीर यांच्याशी हुज्जत घालून त्यांची गचंडी पकडली.

तनवीर यांनी गचंडी पकडण्याबाबत विचारणा केली असता, ऋषीकेश आणि त्याच्यासोबत असलेल्या पुंड नावाच्या व्यक्तीने त्यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर दोघांनीही तनवीर यांना लाथाबुक्क्यांनी व हातचापटीने बेदम मारहाण केली. या घटनेनंतर तनवीर शेख यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी पुंड आणि ऋषीकेश यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११५(२) आणि ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# कायद्याचा अभ्यास करणाऱ्यांसाठी मार्केट यार्ड परिसरात नवीन बॅच

नगर – कायदा (लॉ) परीक्षेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी येथील मार्केट यार्ड परिसरात रास्त दरात क्लासेस सुरू करण्यात आले आहेत. अल्पावधीत प्रशिक्षणार्थ्यांकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे आता येथेच नवी बॅच सुरू करण्यात येत आहे. अशा प्रकारचे प्रशिक्षण देणारा नगरमधील हा एकमेव क्लास असल्याचे संचालक गजानन फुंदे यांनी सांगितले.

लॉ-सीईटी अॅण्ड क्लॅट या क्लासमध्ये लॉच्या विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले लॉजिकल रिझनिंग, जनरल नॉलेज, मुख्य कायद्याचे विषय तज्ज्ञ वकिलांकडून शिकवले जातात. याची अत्यंत उत्कृष्ट तयारी परीक्षा देणार्या विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाते. त्यांना हा क्लास उज्वल यशाची हमी देतो, अशी माहिती संचालक श्री. फुंदे यांनी दिली. लॉ करताना नोकरीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही या क्लासने 'संडे बॅच' सुरू केलेली असून, असे विद्यार्थी रविवारी क्लास करून आपल्या परीक्षेची योग्य तयारी करू शकतात, असे सांगण्यात आले. विद्यार्थ्यांना वकिली पद्धतीने पॉईंट मांडणे, विषयाची खोली समजावून सांगणे तसेच वकिलीसाठी आवश्यक असलेले गुण शिकविण्यासाठी प्रयत्न केले जातात, असेही संचालक श्री. फुंदे यांनी सांगितले. कायदा (लॉ) परीक्षेचा अभ्यास करणार्या विद्यार्थ्यांनी या क्लासमध्ये आपला प्रवेश निश्चित करून, वरील सर्व वैशिष्ट्यांसह आपली वकिलीची पदवी निश्चित करावी, असे आवाहन श्री. फुंदे यांनी शेवटी केले..

# 'ऑटिझम जनजागृती'चा नगरमध्ये घुमला आवाज

नगर – सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौक परिसरात 'मी राजहंस' लर्निंग डेव्हलपमेंट अॅण्ड मल्टी थेरपी सेंटरच्या वतीने जागतिक ऑटिझम (स्वमग्नता) जागरूकता दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील संवेदनशीलता वाढवणे आणि विशेष मुलांच्या कलागुणांना वाव देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. रॅलीसोबतच या विशेष मुलांनी स्वहस्ते बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन देखील भरवण्यात आले होते. यावेळी पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य अमोल घोलप, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक अॅड. ऋग्वेद गंधे, मनस्फूर्ती प्रतिष्ठानचे अध्यक्ष मधुकर काळे, मनस्फूर्ती प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष संतोष आहेर यांच्यासह सेंटरचे स्टाफ उपस्थित होते. यावेळी 'मी राजहंस' सेंटरच्या संचालिका आणि चाइल्ड सायकॉलॉजिस्ट तेजस्विनी आहेर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

विशेष मुलांच्या पालकांनी आणि स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत, अशा कार्यक्रमांमुळे मुलांच्या आत्मविश्वासात भर पडत असल्याची भावना व्यक्त केली.

